पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

वर्ष : १ । अंक तिसरा । मराठी पाक्षिक । मूल्य : २५ ₹ । दिनांक : ३० सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर



२ ऑक्टोबर १८६९ ते २ ऑक्टोबर २०१८...

बापूजी नॉटआऊट १५० । एका महात्म्याची जडणघडण । बापूजी मरते नहीं ।
राफेल - देशाविरुद्ध गद्दारी । वंचितांचे संचित । जय-भीम कॉम्रेड


मेट्रो चाय
ताजगी के रंग
मेट्रो चाय के संग
ताजगी के रंग
मेट्रो चाय के संग
METRO
PREMIUM GOLD TEA
METRO
PREMIUM GOLD TEA
Taste of assam
METRO TEA
www.teacoffeeassociation.com
Supported by TCA India
WNK INDUSTRIES PVT. LTD.
TEACOFFEE ASSOCIATION
For enquiries kindly mail us at : info@metrotea.in

**संपादक**
चेतन शिंदे

**मुखपृष्ठ/रेखाटणे**
धनंजय गोवर्धने

**मांडणी**
सतीश डोंगरे, सचिन ओव्हाळ

**संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :**
११, तळमजला, बी. ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग,
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.),
मुंबई – ४०० ०१६

**मुद्रक**
विकास प्रिंटिंग ॲण्ड कॅरिअर्स प्रा. लि.
३२, एमआयडीसी, सातपूर, नाशिक – ०७

**संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१

Email :
thepeoplespost2014@gmail.com
Website :
www.peoplespost.in
Facebook :
@thepeoplespost
(या अंकातील लेखांचे हक्क सुरक्षित)

**जाहिरात विभाग**
संपर्क : ९८२१४४५४०९/८८०५१५१४५२

**वर्गणीदारांसाठी संपर्क**
सचिन : ७३५००९१५६९

**अंकासाठी संपर्क**
८८८८५४१८२२ (Whatsapp)

**वर्गणी : वार्षिक ५०० रुपये**

**(वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट)**

पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : १
अंक ३, ता. ३० सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर

**संपादकीय...**

गांधीजींचा जीवनपट – नागसेन बागडे ........ ०७
गांधीजींवरील दर्जेदार ग्रंथ ........ ०८
महात्मा गांधी मरत नाहीत – तुषार गांधी ........ ०९
जय-भीम कॉम्रेड – डॉ. भालचंद्र कांगो ........ १४
मला उमजलेले गांधी – डॉ. सुरेश खैरनार ........ १७
बाबासाहेबांच्या विचारांमुळेच घडलो – निखिल मेश्राम ........ २०
एका महात्म्याची जडणघडण – डॉ. रावसाहेब कसबे ........ २४
युवकांसाठी मानसमैत्री – डॉ. हमीद दाभोलकर ........ ३०
श्वासागणिक लढणाऱ्या नजूबाई ........ ३४
सत्याची तहानच मूलभूत प्रेरणा – डॉ. बी. जी. वाघ ........ ३६
राफेल-देशाविरुद्ध गद्दारी ........ ३८
वंचितांचं संचित ........ ३९
सत्ता मस्तवाल तेव्हा पुढाऱ्यांच्या जिभा सुटतात ........ ४०
कर्नाटकात सावित्रीबाई ........ ४२
अपेक्षा – मनोहर जाधव ........ ४३
संविधान धोक्यात – डॉ. थोरात ........ ४४

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी विकास प्रिंटिंग ॲण्ड पॅकेजिंग, सातपूर, नाशिक येथे छापून फ्लॅट नं. ४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१ ००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. ✻ संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत, प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. RNI.Reg.No. MAHMAR49026

संपादकीय...

# बापूजी नॉटआऊट १५० : पुन्हा बॅटिंग त्यांचीच...

प्रिय बापूजी, काळ किती धावधाव धावतोय नाही...! तुमचा काळ जेवढा धावत होता ना त्याच्या शंभरपट आमचा काळ धावतोय. फरक एवढाच की, तुमच्या काळाच्या अंगावर विचारांची, मूल्यांची वस्त्रं होती. निदान पंचा तरी होता. सोबतीला शेळी होती. 'वैष्णव जन तो तेने कहिए' वगैरे म्हणायला कुठं कुठं कोपऱ्यात जागाही होती; पण आमचा बेभान धावणारा काळ विवस्त्र आहे. तुमच्या ग्रामीण भारताच्या भाषेत बोलायचं तर नंगा आहे. 'नंगे को खुदा भी डरता है' असं म्हणतात ना! म्हणून तर या काळाची भीती आम्हालाच वाटतेय. तो कधी अंगावर येईल, कधी स्फोटकं घेऊन येईल, कधी माणसांची कत्तल करेल याचा नेम नाही राहिलेला. त्यानं तुमच्या सोबतीला असणारी शेळीही कुणा खाटकाच्या दारात बांधलीय. मस्तपैकी दम बिर्याणी होणार आहे म्हणे तिची... आम्ही जेव्हा जेव्हा परदेशात जातो तेव्हा स्कॅनिंगच्या वेळी, भेटीगाठीच्या वेळी तुमचं नाव घेतोच घेतो. जमेल तेवढ्या पावत्या तुमच्या नावानं फाडतो. चलनावर तुमचाच फोटो असल्यानं हेच चलन वापरावं लागतं. आम्ही आमच्या भूमीत मात्र तुमचंच नाव घेत नाही. ते घेतलं की जाती संपवाव्या लागतात, सत्तातृष्णेपासून दूर जावं लागतं. उपोषण आणि सत्याग्रह करावा लागतो. राजघाट शुद्ध करून घ्यावा लागतो. अलीकडं तिथं खूप कबूतरं जखमी होतात. त्यांना मलमपट्टी करायला कुठं जमतंय आम्हाला. लिक्विड फूड आणि गोळ्या खाऊन काम करून घेण्याच्या काळात तर हे जमणं शक्यच नाही.

राष्ट्र कशाला म्हणतात, राष्ट्रप्रेम कशाला म्हणतात, स्वातंत्र्य कशाला म्हणतात हे किती सोपं करून सांगितलं होतं तुम्ही आम्हाला. वरच्या बुद्धिजीवी वर्गात अडकलेली स्वातंत्र्याची चळवळ तुम्ही तळागाळात किती सहजपणे नेली होती. ज्या काळात बुद्धिजीवी होणं, सदाशिव पेठेत भाषण करणं, रेशीम बागेतून अल्पसंख्याकांविरुद्ध बांग देणं यालाच चळवळ म्हटली जायची. तोच स्वातंत्र्यसैनिक असायचा. तुम्ही हे सारं सारं बदललं. जो दांडी यात्रेत मूठभर मीठ उचलतो तो स्वातंत्र्यसैनिक, जो चरखा चालवतो तो स्वातंत्र्यसैनिक, जो नि:शस्त्र होऊन परकीयांच्या बलाढ्य शस्त्रासमोर छातीची ढाल करतो तो स्वातंत्र्यसैनिक. आता हे सारं बदललंय. जो दुसऱ्याच्या गाईला दुसऱ्याची वैरण घालतो तो राष्ट्रभक्त. जो आपल्या छातीचा इव्हेंट करतो तो स्वातंत्र्यसैनिक, जो धर्मस्थळं पाडण्याचं प्लॅनिंग करतो तो राष्ट्रभक्त आणि तुमची हत्या करणाऱ्या गोडसेला जो नाटकात, कवितेत आणि पुतळ्यात आणण्याची भाषा बोलतो तो राष्ट्रभक्त. राष्ट्रभक्तीची व्याख्याही अशी थ्री फोर्थ किंवा नो फोर्थ झालीय म्हणजे नंगीच की बापूजी!

आम्हाला असं वाटलं की, एखाद्या माणसाची एकदाच हत्या होते; पण आता तर भलतंच घडतंय. एकाच माणसाची रोज रोज हत्या करण्याचं संशोधन आलंय. त्याचे विचार संपवायचे, त्याला हुकूमशहा ठरवायचं, त्याला पाकिस्तान निर्मितीचा जनक ठरवायचं. त्याला निरक्षर आणि देश मागं नेणारा ठरवायचं. पाकला खूप मोठी रक्कम दिली असं म्हणायचं. खरं तर मल्ल्यानं पळवून नेलेल्या रकमेपेक्षा ही रक्कम खूप कमी होती आणि तिच्याशी तुमचा काही संबंध नव्हताच.

> डॉ. बाबासाहेबांनीच त्यांच्या थॉट्स आणि पाकिस्तानमध्ये स्पष्ट लिहिलंय की, तुमचा आणि पाक निर्माण होण्याचा काही संबंध नव्हताच. हिंदू-मुस्लिमांचं ऐक्य अबाधित राहावं म्हणून तुम्ही प्रतिज्ञा तयार केली होती. ती प्रतिज्ञा अशी : ईश्वराला साक्षी ठेवून आम्ही हिंदू-मुस्लिम अशी घोषणा करत आहोत की, आम्ही एकाच आई-बापाच्या मुलांप्रमाणे आपसात व्यवहार करू. आपसात कोणताच भेदभाव ठेवणार नाही. एकाचे दु:ख दुसऱ्याचे असेल, आणि या दु:खाच्या निवारणार्थ परस्परांना सहाय्यता करू. आणि परस्परांचे धर्म आणि धार्मिक भावनांचा आदर करू. परस्परांच्या धार्मिक कर्तव्यात कोणत्याही प्रकारची बाधा उत्पन्न करणार नाही आणि धर्माच्या नावावर हिंसाही करणार नाही.

स्वच्छता मोहीम जी तुम्ही चालू केली तिच्या मागं अहंकाराला संपवण्याचा आणि आपलं आतलं जग सुंदर करण्याचा हेतू होता. आम्ही आता तुमचं स्वच्छतेचं कामही काढून घेतलं. त्याचाही





इव्हेंट आणि छोट्या पडद्यावरचा शो केला. तुमचं काहीच ठेवायचं नाही असं ठरवलं जातंय. बापूजी, तुमचा चष्मा पळवला जातोय. हातातली काठी पळवली जातेय. तुमची काठी घेतलेलं पोरगं हायजॅक झालंय. खादीला दिलेलं तुमचं नाव पुसलं जातंय. तुमचे विचार छापायला आज कुणी तयार नाहीत. आहेत त्याच्यावर बोळा कसा फिरवायचा याचं मस्त प्लॅनिंग चालू आहे. बापूजी मोठे की गोडसे, असा प्रश्न विचारला की गोडसे असं उत्तर जबरदस्तीनं पाठ करून घेतलं जातंय. कुणी सांगावं उद्या कुणी गोडसेलाच महात्मा म्हणेल! गोडसेची पालखी वाहणाऱ्यांची संख्या नाहीतर वाढलीय की बापूजी...

बापूजी तुम्ही अनेकदा सांगितलं की, मला स्वातंत्र्य नको आहे तर स्वराज्य हवं आहे; पण आम्ही स्वराज्याकडे गेलोच नाही. भीती वाटते. तेथे गेल्यावर भ्रष्ट राजकारण करता येत नाही. एकालाच अनेकदा निवडून देता येत नाही. भगव्या, हिरव्या वस्त्रातल्या बुवा-बाबाला संसदेत पाठवता येत नाही. खुलेआम भ्रष्टाचार करता येत नाही. आम्ही काय तुम्हाला येडे वाटलो की काय बापूजी? अरे हो अजून एक राहूनच गेलं की... तुमचं एक स्वप्न होतं की, कधीतरी या देशाच्या पंतप्रधानपदी भंग्याची मुलगी विराजमान होईल आणि नेहरूंसारखा देखणा तरुण तिचा पी.ए. होऊन तिच्या मागं मागं धावेल... आता हे स्वप्न नेहरूच काय पण कोणत्याही वरच्या माणसाला मान्य होणार नाही. आमच्या डीएनएमध्ये गुलामीचे आणि हाजी हाजी करण्याचे जिन्स इतके जबरदस्त आहेत की, आम्हाला गुलामासारखे वागवणाऱ्या पूर्वीच्या सरदारांना आणि राजांनाच आम्ही पुन्हा पुन्हा निवडून देतो. त्यासाठी टिऱ्या बडवतो. लोकशाहीच्या नावानं ढोल वाजवतो. आवाज तुमच्यापर्यंत पोहोचेल यासाठी प्रयत्नही करतो. कसली आलीय लोकशाही बापूजी! ही तर पक्ष आणि संघटनांच्या नावानं टोळी करून सत्ता मिळवायची खेळी. टोळीप्रमुखच लोकशाहीचा गाल ओढतात. तेच तिच्या गालावरचा तीळ शोधून कविता करतात.


तुमच्या काळात तुम्ही आंतरजातीय विवाहांना एक मिशन बनवलं, आता ऑनर किलिंगचा जमाना आहे. ठार मारलं जातं की बापूजी त्यांना! किती मस्त सुविचार सांगितला होता तुम्ही की, प्रत्येक महिलेत विशेषतः पत्नीत फक्त मादीच नसते तर एक माई-आईही असते. तुम्हाला पटलं तुम्ही कस्तुराला बा म्हणजे आई म्हणायला लागलात आणि आता गर्भाशय भाड्यानं देण्याचे होर्डिंग्ज लागतात. जणू काही गर्भाशय म्हणजे बॉडीचा फक्त स्पेअर पार्ट. मूल्य नव्हेच!

तुम्ही सामान्य होऊन जगला. गरीब होऊन जगला. लोकांनी स्वतःला तुमच्यात आणि तुम्ही स्वतःला लोकांत पाहिलं. तुम्ही दोघांनी सुख-दुःखं वाटून घेतली. दुःखाचा उगम शोधला. त्याची दाहकता समजून घेतली. परदेशात बॅरिस्टर होऊन आलेला मिसुरडा तरुण मैला भरलेली पाटी स्वतः च्या डोक्यावर घेतो म्हणजे घेतली तेव्हा समाज आणि जात व्यवस्थेत किती मोठा भूकंप झाला होता बापूजी! सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय सुधारणा घडवण्यासाठी अनेक भूकंप तुम्ही जन्माला घातले. आम्ही आता विज्ञानात खूप प्रगती केली असल्यानं असे सुधारणांच्या क्षेत्रात भूकंपच होणार नाहीत याची काळजी घेतो. पांडुरंगाच्या गावात कुणी गरीब हातानं मैला उचलू नये यासाठी किती वर्षांपासून मागणी करतोय ठाऊक आहे का? जाऊ द्या तुम्ही मोबाईल वापरत नसाल! व्हॉट्सअॅप तर नाहीच नाही. तुम्हाला कसं लगेचंच कळणार?

आता तुम्ही म्हणाल बापूजी की, माझी हत्याच झाली असेल तर मोबाईलचा प्रश्न कसा? यावर उत्तर असं की, तुमची हत्या झालीय हे कोर्ट वगळता कुणी मान्य करत नाही. काँग्रेसनं

त्यांच्या राजकारणासाठी तुम्हाला बळेबळेच जिवंत ठेवलंय. तुमचं ऐकायचं काहीच नाही फक्त 'बापू के नाम व्होट दे दाता' म्हणायचं. भारत-पाक संघर्ष मिटावा असं खरंच कुणाला वाटत असावं काय? हा संघर्ष तेव्हाच मिटतो जेव्हा तुम्ही जिवंत असता. आम्हाला सांगता आलं पाहिजे ना पाकिस्तान तुम्हीच निर्माण केला! हे सारं घडायचं असंल ना बापूजी तर तुम्हाला जिवंत ठेवावं लागतं आणि दुसरं म्हणजे तुम्ही असं काही जगला, असं काहीतरी करून मातीच्या कणाकणांत गेला की तुम्हाला मृत्यूच नाहीय! गोडसेंनी पुन्हा गोळ्या घातल्या. तुमचे पुतळे कोणी कितीही फोडले तरी तुम्हाला मृत्यू काही नाहीच आहे. आता गंमत अशी की तुमच्या शत्रूंना तुम्ही जिवंतही पाहिजे आणि तुमची हत्याही झाली पाहिजे. एक मोठा लोचा. केमिकल लोचा आहे. बापूजी एक वचन आहे आणि ते म्हणजे महापुरुषानं जन्माला आलं पाहिजे पण कुठं हेही त्याला ठरवता आलं पाहिजे. आता हेही थोडं कठीणच नाही का? आपली हत्या करणाऱ्या, आपला पुतळा करणाऱ्या, राजकारणात आपल्याला फोडणीप्रमाणे वापरणाऱ्या समाजात तुम्ही जन्माला आलात. आम्ही काय सामान्य माणसं कुठंही जन्माला येऊ आणि कुणालाही उरावर बसवून घेऊ.

बापूजी पोरबंदरमध्ये जन्माला येऊन तुम्हाला दीड दशकं झाली. मार्क्सपेक्षा फक्त पन्नास वर्षांनी आणि डॉ. बाबासाहेबांच्या अगोदर फक्त बावीस वर्षे जन्माला आलात. म्हणजे जगात वर्गयुद्ध आणि भारतात वर्णयुद्ध पेटायच्या दरम्यान. कामगार, शेतकरी यांचं प्रथम संघटन तुम्ही केलं आणि नव्या व्यवस्थेनं ते मोडून टाकलं. गांधी नाही आहेत हे चंपारण्य अजून मान्य करत नाही. शेतकरी मान्य करत नाहीत. मीठ उचलून स्वातंत्र्यसैनिक झालेले मान्य करत नाहीत. व्यवस्था मोडून आंतरजातीय विवाह करण्यास निघालेले मान्य करत नाहीत. बापूजी तुम्ही चलनावर जसं आहात तसं त्यांच्या काळजातही आहात. उजव्यांच्या रडारवर आणि काँग्रेसच्या मतपेटीवरही आहात. कुठं नाहीय तुम्ही? बापूजी आम्हाला कळलंय की तुमचा आमच्यावर परिणाम झाला नाही, पण मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला, रोमेन रोल्लाड, आईनस्टाईन, खान अब्दुल गफार खान, दलाई लामा, ब्रह्मदेशाची नेता, मारिया नासर्दा, हो ची मिन्ह व्हियतनाम, सीजर चावेज मेक्सिको, हेली सेलासी इथोपिया, यू थांट, अल गोर अमेरिकेचे माजी उपराष्ट्रपती, बराक ओबामा, मदेलिने स्लेड अजून किती नावं सांगायची जागतिक पातळीवरची. जाऊ द्या अजून खूप बोलायचं होतं; पण तुमच्या प्रार्थनेची वेळ झाली असेल आणि पिस्तूल घेऊन येण्याची गोडसेंचीही वेळ झाली असेल. काय मजेशीर आहे नाही? गोडसेंनी कितीही गोळ्या घातल्या तर तुम्ही अजरामरच! गोडसे आता राफेलसारखं विमान घेईल आणि वरून गोळ्या घालेल, पण तरीही तुम्ही अमरच! नाही तर तुमचा आत्म्यावर विश्वास होताच की... म्हणून तर हे सारं लिहिण्याचं, बोलण्याचं धाडस केलंय बापूजी. चूकभूल देणे घेणे. डाव्या हाताचा अंगठा केला म्हणून रागावू नका; कारण तुमची राष्ट्रीय शाळा आमच्यापर्यंत पोहोचलीच नाही आणि आहेत त्या बंद पडायला लागल्या आहेत. सरकारी भिंतीवर तुमचा फोटो आहे ना, त्यामुळे त्या कशातरी तग धरून आहेत. आम्हाला अंगठा ठेवायला निदान तिथं तरी जागा आहे. नाही तर इंडियात कोण गिणतो बापूजी आम्हाला...




***

# गांधीजींचा जीवनपट

**१८६९ (२ ऑक्टोबर)- गुजरातमध्ये पोरबंदर येथे जन्म**

१८८३ - कस्तुरबांशी लग्न.
१८८७ - मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण.
१८९३ - दक्षिण आफ्रिकेत नोकरीसाठी रवाना.
१८९९ - बोअर युद्धास सुरुवात.
१९०४ - फीनिक्स आश्रमाची स्थापना.
१९०६ - ब्रह्मचर्याची शपथ घेतली.
१९१५ - भारतात आगमन.
१९१७ - बिहारमध्ये चंपारण सत्याग्रह.
१९१८ - अहमदाबाद येथे गिरणीमालकांविरुद्ध व खेडा येथे सत्याग्रह.
१९१९ - 'नवजीवन' व 'यंग इंडिया'चे प्रकाशन.
१९२२ - चौरीचौरा हिंसा चळवळ थांबविली.
१९३० - काँग्रेसचा संपूर्ण स्वराज्याचा ठराव, दांडीयात्रा.
१९३०/३२ - गोलमेज परिषद.
१९३१ -गांधी-आयर्विन करार.
१९३२ - डॉ. आंबेडकर-गांधीजी भेट, पुणे करार.
करारावर गांधीजींची स्वाक्षरी नाही.
१९३३ - 'हरिजन'चा पहिला अंक.
१९३६ - सेवाग्राम स्थलांतर.
१९४० - वैयक्तिक सत्याग्रह सुरू.
१९४२ - 'छोडो भारत' आंदोलन.
१९४५ - 'सीमला परिषद', आझाद हिंद खटला सुरू.
१९४७ - भारत स्वतंत्र. नोवाखली दंगल, गांधीजी कोलकाताला रवाना.
१९४८ - दंगली शमविण्यासाठी दिल्लीत उपवास.
३० जानेवारी १९४८- गांधीजींची हत्या.

**संकलन : नागसेन बागडे**





एखाद्या देशाची संस्कृती तेथील रहिवाशांच्या हृदयात आणि आत्म्यात वसलेली असते.



# गांधीजींवरील दर्जेदार ग्रंथ

- ब्राऊन व परेल –द केंब्रिज कंप्यानियन टू गांधी
- टीडरीक, कॅथरीन – गांधी
- प्रमोद कपूर – गांधी–एन इलस्ट्रेटड बायोग्राफी
- गीरजा कुमार–ब्रह्मचर्य, गांधी ॲण्ड हीज विमेन असोसिएट्स
- ॲडम्स, जड – गांधी–नेकेड एम्बिशन
- किंग, मेरी – गांधीयन नानव्हायोलंट स्ट्रगल ॲण्ड अनटचेबिलिटी
- इन साऊथ इंडिया
- लॅलव्हेल्ड, जोसेफ – ग्रेट सोल
- गुहा, रामचंद्र – गांधी बिफोर इंडिया
- गुहा, रामचंद्र – गांधी–दी इयर्स दॅट चेंज्ड द वर्ल्ड
- ॲलन, डगलस – महात्मा गांधी

एकीकडे खादी गरिबांकरिता भाकर कमावण्याचा एक सन्माननिय व्यवसाय आहे तर दुसरीकडे अहिंसक पद्धतीने स्वराज्य मिळवण्याचे ते एक अतिरिक्त व तुलनात्मक दृष्टीने अधिक मूल्यवान अस्त्रही आहे.





# महात्मा गांधी मरत नाहीत किंवा मारलेही जात नाहीत

गोडसेवादी वृत्तींना वाटलं होतं की, आपण गांधी मारू शकतो. खलास करू शकतो. त्यांनी प्रयत्नही केला पण या वृत्तीला कळून चुकलं की, महात्मा गांधी मरत नाहीत किंवा मारलेही जात नाहीत. गेली १५० वर्षे आपण हेच पाहतोय. जे विचार, प्रेरणा आणि सत्त्व बनून जनतेच्या काळजात चिकटतात ते युगानुयुगे जगत असतात. अगदी बिनधास्त.

**प्रश्न : देशातील बदलतं समाजकारण, राजकारण पाहता महात्मा गांधींच्या विचारातला भारत आज तुम्हाला दिसतो का?**

**तुषार गांधी :** बापूंची राष्ट्राची संकल्पना सगळ्यांनी मिळून तयार केली होती. राष्ट्राची एक घटना बनवली. राष्ट्राचा एक विचार मांडला. विचारामुळे राष्ट्र बनतं. राष्ट्र काही भूखंडामुळे किंवा लोकांच्या केवळ समूहामुळे बनत नाही. राष्ट्राची एक परिकल्पना असते, तिला अनुसरून जे लोक एकत्र येतात त्यांच्यामुळे राष्ट्र बनतं. बापू आणि इतरांची राष्ट्राबद्दल उदारवादी आणि सगळ्यांना एकत्र घेऊन जाणारी, सर्वांना एका पातळीवर ठेवून चालण्याची आणि राष्ट्राची निर्मिती करणारी परिकल्पना होती. कट्टरतावादी धार्मिक विचारधारा त्यांनी कधी मान्य केली नाही. आता मात्र देशात काही लोक कट्टरतावादी धार्मिक वातावरण निर्माण करत आहेत. आताचे सत्ताधारी त्याला पाठबळ देत आहेत.

**प्रश्न : ते पाठबळ का देत आहेत?**

**तुषार गांधी :** परंपरावादी धर्म, रूढीमध्ये गुंतलेला धर्म, जातीच्या वर्चस्वावर आधारित धर्म त्यांना हवा आहे. त्याचे वर्चस्व त्यांना स्थापन करायचे आहे. पण गेल्या ७० वर्षांपासून त्यांना यासाठी वाव भेटत नव्हता. उदारवादी विचारधारा आणि उदारवादी राजकीय पक्षांमध्ये नैतिक भ्रष्टाचार आला. सत्तेची लालच



असे जगा की, तुम्हाला उद्याच मरायचे आहे आणि असे शिका की तुम्हाला आयुष्यभर जगायचे आहे.



त्यांच्यामध्ये निर्माण झाली. त्यामुळे कट्टरतावादी लोकांच्या बाजूने काही लोकांची सहानुभूती वळत गेली. तिचा त्यांनी भरपूर फायदा घेतला. आज आपल्याला जे राष्ट्र दिसतं त्यात त्यांनी मूळ राष्ट्राची कल्पना, विचार वगळून केवळ भूखंड आणि प्रतीक हेच राष्ट्र असतं या विचाराला राष्ट्रवाद बनवून ठेवला आहे. म्हणून असं वाटतं की, हे जे राष्ट्र आता आपल्यासमोर दिसतं ते बदललेलं आहे. ज्या स्वातंत्र्यामध्ये आपण वाढलो, मोठे झालो ते राष्ट्र आता राहिलेलं नाही. विविध जाती-धर्माचे लोक ज्या राष्ट्रात राहतात ते राष्ट्र कट्टरतावादी राष्ट्र म्हणून तयार होत आहे. आपल्याकडे स्वातंत्र्याची एक व्यक्तिगत परिकल्पना आहे. आज आपल्यावर एका विचाराची परिकल्पना लादली जात आहे. तुमचा विचार जर राष्ट्राच्या नेत्यांविरुद्ध, त्यांच्या विचारधारेच्या विरुद्ध असेल तर तुम्हाला राजद्रोही किंवा राष्ट्रद्रोही ठरवलं जातं, ही दडपशाही आहे. आपल्यासाठी गांधीजींनी राष्ट्राची संकल्पना सांगितली होती. त्यांच्याविरुद्ध आज नवी धर्माधिष्ठित राष्ट्राची कल्पना उभारली जात आहे. गांधींच्या राष्ट्राच्या संकल्पनेत सर्वांना समान वागणूक, बंधुभाव याला महत्त्व आहे. आजच्या राष्ट्राच्या संकल्पनेत धर्मांधतेला राष्ट्रवाद म्हणून सांगितलं जात आहे. हे अत्यंत चुकीचं आहे. घटनेच्या विरोधातील आहे.

**प्रश्न : हे धर्मांध आहेत, पण काँग्रेसवाले आणीबाणी लादणारे आहेत. दोघांनीही घटनेची पायमल्ली केली आहे?**

**तुषार गांधी :** आणीबाणीचा काळ सोडला तर विचारांवर कधी अंकुश आणायचा प्रयत्न कोणीही केला नाही. सरकारचा विरोध किंवा सरकार विरुद्ध कोणी आपल्या संविधानाच्या आत राहून प्रोटेस्ट केला तर गुन्हा मानला जात नव्हता. आता स्थिती अशी झाली की, सरकारला विरोध कोणी केला तर तो देशद्रोह किंवा राजद्रोह समजला जातो. विचारांनी केलेल्या विरोधाला राष्ट्रद्रोहाचं स्वरूप दिलं जातं. जर सरकार लोकांविरुद्ध काम करत असले, त्यांची धोरणं लोकांच्या विरुद्ध आहेत असं वाटत असेल तर लोकांचं हे कर्तव्य बनतं की, लोकांनी सरकारच्या विरोधात नियमाने गेलं पाहिजे. आज मात्र सरकारच्या विरुद्ध कोणी बोलला तर त्याला राष्ट्रद्रोही म्हणून घोषित केलं जातं. गद्दार समजून त्याच्यावर कारवाई केली जाते.

**प्रश्न : हे लोकशाहीसाठीही घातक आहे ना?**

**तुषार गांधी :** लोकशाही गणराज्यासाठी फार घातक आहे. चिंताजनक परिस्थिती आहे. यावर बापूजींनी लिहिलं आहे की, ''अगर आप को लगे की सरकार जनहीत के खिलाफ में कोई कारवाई कर रही है । या जनहीत के विरुद्ध उनके कदम चल रहे है, तो यह आपका कर्तव्य है की आप राष्ट्रद्रोह तक करे।'' इंग्रजीमध्ये 'सेडीशन' एक शब्द आहे ज्याचा दुरुपयोग इंग्रजांच्या काळापासून आपल्या राष्ट्रामध्ये होत आहे. एक 'सेडीशन लॉ' आहे. राष्ट्रद्रोही लिखाण, विचार किंवा कृती आपण जर करत असू तर ती दंडनीय आहे. बापूजींनी तेव्हा हे सांगितलं की, सेडीशन पण करावं लागेल, तर ती करण्याची लोकांमध्ये हिंमत असायला पाहिजे. त्यामुळे तुम्हाला जे भोगावं लागतं ते भोगण्याची तयारी तुमच्यामध्ये असली पाहिजे. सरकारलाही याची जाणीव असायला पाहिजे की, कोणते कार्य राष्ट्रहिताचं आहे आणि कोणतं कार्य राष्ट्रविरोधातले आहे. ही समज आजच्या पॉलिटिकल क्लासमध्ये दिसत नाही. आज तुमच्या आमच्यात जमत नाही म्हणजे तुमची आमची दुश्मनी हा एक पर्याय लोकांपुढे निर्माण केला जात आहे. तू आणि मी किंवा ते आणि आम्ही अशी गटबाजी सर्वत्र सुरू झालेली आहे. त्यामुळे राष्ट्राची जी परिकल्पना आहे ती भ्रष्ट होत आहे.

**प्रश्न : आज जर गांधीजी असते तर त्यांनी या सगळ्या परिस्थितीकडे कसं पाहिलं असतं ?**

**तुषार गांधी :** हा प्रश्न मला पुष्कळ वेळा विचारला जातो की, बापू असते तर त्यांनी काय केलं असतं? माझं यावर एकच उत्तर आहे की, ते नाडीवैद्य होते. ते नाडी बघून १० वर्षांनंतर तुम्हाला कोणता रोग होणार आहे हे सांगत होते. दहा वर्षांनंतर होणाऱ्या रोगाला नष्ट करण्यासाठी आतापासून


तुम्ही जे काही करता ते महत्त्वपूर्ण ठरू शकते, परंतु त्यापेक्षाही महत्त्वपूर्ण हे की तुम्ही काही तरी करायला हवं.




आपण काय करायला पाहिजे त्याचा विचार ते करायचे. जर आज बापू असते तर परिस्थिती इथपर्यंत पोहोचलीच नसती. आज जी परिस्थिती आहे याची बीजं जवळपास २० वर्षांपूर्वी पेरली गेली आहेत. बापू असते तर ती आज दिसली नसती. त्यांना कळलं असतं भारत कुठं जात आहे आणि त्याची दशा काय होणार? ते थांबवण्यासाठी तेव्हाच कार्यरत झाले असते. त्यासाठी त्यांनी राष्ट्रजागृतीच्या कामाला सुरुवात केली असती. आज बापू आपल्यात नाहीत पण बापूंचा विचार आपल्यामध्ये जिवंत आहे. आजच्या प्रासंगिक काळात सर्वांना सोबत घेऊन पुढं जाण्याचा बापूंचा विचार एक मार्गदर्शक विचार म्हणून आपल्यासमोर आहे.

**प्रश्न : गांधींचा विचार संपत चालला आहे किंवा सद्यपरिस्थितीत लागू पडत नाही असे तुम्हाला वाटतं का?**

**तुषार गांधी :** अजिबात नाही. आजही गांधी विचारावर चालणारे करोडो लोक आहेत. आजही आपला देश गांधी विचारापासून फार दूर गेला नाही. उलट बापूंची विचारधारा दिवसेंदिवस वाढत चालली आहे. जी विचारधारा फार स्वच्छ असते, लोकहिताची असते ती कायम जिवंत राहते. कोणतीही विचारधारा काळानुसार, लोकांच्या गरजांनुसार रुजत असते. ज्या सोप्या विचारधारा असतात, ज्यांचं आपल्या दैनंदिन जीवनात नैसर्गिक एक सहभाग असतो, तिथं विचारधारा टिकवून ठेवणं जास्त सोपं असतं. बापूजींचा हॉलमार्क सिंप्लीसिटी होता. साध्या भाषेत लोकांचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्याची आणि लोकांना समजेल अशा भाषेत प्रचार करण्याची त्यांची जी वृत्ती होती ती लोकांना मान्य होती. त्यांच्या साध्या जीवनशैलीचं प्रतिबिंब लोकांना जाहीरपणे दिसायचं. त्यांना सांगायची गरज पडत नसायची, कारण त्यांच्या वर्तणुकीमध्ये, त्यांच्या जीवनशैलीमध्ये त्यांनी साधं राहणीमान व उच्च विचार आणि राष्ट्रहिताचं ध्येय स्वत:च्या कृतीत आत्मसात केलं होतं, ते लोकांना दिसायचं. ज्यांना बापूंच्या विचारधारेचा स्वत:साठी आणि स्वत:च्या अस्तित्वासाठी धोका वाटत होता त्यांना ते खटकायचं आणि म्हणून विचाराचा प्रतिकार विचारांनी न करता त्यांना त्यांची हत्या करावी लागली. पण हत्याऱ्यांना हे फार नंतर कळलं की, माणूस संपतो पण माणसाचे विचार



**मिठासाठी आंदोलन करताना महात्मा गांधी यांचे दुर्मिळ छायाचित्र.**



व्यक्तीची ओळख त्याच्या कपड्यांवरून नव्हे तर त्याच्या चरित्रावरून ठरत असते.



संपवणं फार अवघड असतं. त्यामुळेच हे सत्य आहे की, गांधींसारखा माणूस मरत नाही आणि मारला पण जात नाही. उलट तो दिवसेंदिवस स्वीकारला जातो. आज गांधीजींना मोठ्या प्रमाणात लोक स्वीकारत आहेत. काही लोकांनी त्यांच्या विचारांमध्ये भ्रष्टता आणायचा प्रयत्न केला असेल, कारण एखादी व्यक्ती जेव्हा शरीराने आपल्यात नसते तेव्हा त्यांच्या विचारात काही भेळमिसळ करण्याची संधी विरोधकांना मिळत असते. प्रेरणास्रोत संपतो तेव्हा हळूहळू त्या विचारधारेत भ्रष्टता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र गांधीजींचे जीवनचरित्र, त्यांचं देशप्रेम, देशासाठी त्यांनी अर्पण केलेलं आपलं जीवन आणि ब्रिटिशांपासून स्वतंत्र केलेला देश हे सर्व कर्तृत्व देश कधी विसरणार? गांधींचा विचार, विरोधी विचारधारेच्या लोकांना संपवता येणं कठीणं आहे.

**प्रश्न : भारताला जे स्वातंत्र्य मिळालं ते आज आहे असं वाटतं का ?**

**तुषार गांधी :** हो अगदीच, आज कुठेतरी बोलताना एक रिपोर्ट आलाय. पंतप्रधानांनी सांगितलं की, डिसीप्लेनचा अर्थ डिक्टेटरशीप नाहीय. पण डिसीप्लेन, सेल्फ डिसीप्लेन असेल तरच ती हुकूमशाही होते. सेल्फ डिसीप्लेन ही अशी गोष्ट आहे ती टिकाऊ आहे. तुम्हाला शिक्षा करून, तुम्हाला डांबून ठेवून, त्याची भीती दाखवून जी डिसीप्लेन दाखवण्यात येते ती हुकूमशाहीच असते. म्हणून डिसीप्लेन व्हॉलिंटरी असायला पाहिजे. ती तुम्हाला दगड मारून शिकवली जाणं ते चुकीचं आहे. लोकशाहीमध्ये तर फारच चुकीचं आहे. एक हिंदी म्हण आहे की, ''जीसकी लाठी उसकी भैस''। तसं होतं. तुमच्या हातात शस्त्र आहे म्हणून तुम्ही शिस्त माझ्यावर लादणार आणि जेव्हा माझ्या हातात शस्त्र येणार तेव्हा मग मी तुम्हाला शिस्त लादणार हे चूक आहे. प्रत्येकाने स्वतःहूनच शिस्तीत वागलं पाहिजे. शिस्तीचा हा खरा अर्थ असायला पाहिजे. आज हा फरक आलेला आहे की, मी तुमचा मॉनिटर. मी तुम्हाला शिस्त लावणार हा माझा अधिकार आहे आणि तो अधिकार फक्त मालकाचा असतो, तो सेवकाचा नसतो हे आपण समजून घेतलं पाहिजे. तो लोकांच्या वरचा असतो, तो स्वत:ला लोकांच्या बरोबरीचा समजत नसतो, तसाच फरक आज अनुभवायला मिळत आहे. बापूंनी लोकांना सांगितलं की, तुम्हाला पटत असेल तर करा, मी सांगतो म्हणून तुम्ही हे करू नका आणि त्यांचे जर स्वदेशीचे आंदोलन पाहिले,

सुरुवातीला ते तुमच्यावर लक्ष देणार नाहीत, नंतर ते तुमच्यावर हसणार, नंतर तुमच्याशी भांडणारही तेव्हाच तुमचा विजय होईल.





**महात्मा गांधी यांच्या अंत्ययात्राप्रसंगीचे दुर्मिळ छायाचित्र.**

विविध सत्याग्रह पाहिले तर त्या सर्वांमध्ये एकच प्रखर विचार होता तो म्हणजे 'पटल्यानंतर करा'. मी सांगतो म्हणून करू नका. कारण मी सांगतो म्हणून तुम्ही करत असाल तर मी नसेन तेव्हा ते तुम्ही करणार नाही. म्हणून 'चले जाव' आंदोलन यशस्वी झालं.

**प्रश्न : आत्ताचं सरकार हे हुकूमशाहीचं समर्थन करतं असं वाटतं का?**

**तुषार गांधी :** हो निश्चितपणे! आज जर सरकारला प्रश्न विचारला तर सरकार म्हणते की, आम्हाला कामं करू देत नाहीत, आम्हाला काम करू द्या, प्रश्न विचारू नका. प्रश्न विचारणं म्हणजे तुम्ही राष्ट्रद्रोह करत आहात असे वातावरण निर्माण केलं जात आहे. पण प्रश्न विचारणं तर लोकशाहीमध्ये नागरिकांचा अधिकार असतो. हनुमानचालीसा वाचा म्हणजे माकड तुम्हाला हैराण करणार नाही असा विचार रुजवला जात आहे. पण ती आजच्या काळात किती अवैज्ञानिक गोष्ट आहे. पण लोकांनी त्याला मान्यताप्राप्त करून दिली आहे. लोक त्यांचं अनुकरण करतात. राजकीय पातळीवरून त्याच एका पद्धतीने प्रचार केला जातो. आपली विचारधारा असायला पाहिजे, या मताचे सरकार बनले आहे. दुसऱ्यांचा, स्वत:चा विचार करण्याचा जो गुण आहे त्याला डांबून ठेवायचं काम चालू आहे आणि हे हुकूमशाहीचं लक्षण आहे.


**प्रश्न : 'लेट्स किल गांधी' हे पुस्तक आपण लिहिले आहे. आपल्याला हे पुस्तक लिहावंसं का वाटलं?**

**तुषार गांधी :** मी लहान होतो तेव्हापासून बापूजींच्या हत्येच्या बाबतीत एक विटंबना चालू होती. मला नेहमी कुतूहल असायचं की, असं कसं झालं असेल? आणि का? मी जसजसा मोठा होत गेलो तसा मी बापूंच्या हत्येला स्वीकृत करणं, जे लोक म्हणजे बापूंची हत्या न्याय आहे असं म्हणत होते त्यांना मी फार जवळून पाहिले. तो विचार जास्त प्रखर होता. तो मोठा होत गेलेला मी पाहिला. त्याच्या विपरीत घरातील वातावरण होते. ज्या लोकांना ऐकून मी मोठा झालो, त्यांच्याकडून काहीतरी वेगळंच ऐकू यायचं आणि त्याचा मला फार राग यायचा. बापूंना मारणाऱ्याचा आपण प्रतिकार करू शकत नाही याची खंत मनात होती. पुष्कळ गांधीवाद्यांशी जेव्हा या विषयाला घेऊन मी बोललो तेव्हा त्यांनी गांधी हत्येच्या समर्थनाचा दुष्टाचारी विचार चूक असल्याचे सांगितले. ते जे काही समर्थन करतात ते सगळं खोटं आहे. ते खोटं टिकणार नाही. सत्यच दीर्घकाळ टिकत असते आणि आपण उगीच कशाला यांच्या तोंडी लागायचं, ही गांधीवाद्यांच्या विरोधकांची विचारधारा होती. याचा परिणाम असा झाला की, हा जो दुष्ट प्रचार होता तो प्रचलित आणि स्वीकृत होत गेला. लोकांमध्ये ही एक मान्यता आली की, हे लोक बोलतात त्यांचा प्रतिकार कोणी करत नाहीये तर हेच सत्य असेल. जेव्हा कधी मी बापूंचं जीवन वाचायचो तेव्हा ते ४०० पानांचं पुस्तक असायचं. त्याच्या एका पानावरच त्यांच्या हत्येबाबत लिहिलं जात होतं. नथुराम गोडसे तिकडे होता आणि त्यांनी पाहिलं, तो बापूंच्या समोर गेलाय आणि त्याच्याकडे पिस्तूल होते. त्याने गांधीजींना गोळ्या मारल्या. त्याच्या पुढे मागे कोणी जास्त लिहीत नव्हतं. रिचर्ड ॲटन बरो यांच्या चित्रपटातील कित्येक शॉट्समध्ये नथुराम आणि सावरकरांचे जे प्रतीकात्मक स्वरूप त्यांनी दाखवलं आहे त्यांना बापूंचा विरोध करताना दाखवलं आहे. त्यांच्यात बापूंचा द्वेष होता असं दाखवलं होतं. पण ते फार कमी दाखवलं होतं म्हणून मग मला असं सांगण्यात आलं की, जर तुला इतकं वाटतं तर तू लिही ना. याबाबत का लिहीत नाहीस? म्हणून संशोधन करायला सुरुवात केली. जवळपास चार-साडेचार वर्षांत संशोधन करून, पुष्कळ सारी कागदपत्रे वाचून अहवाल वाचल्यानंतर पुस्तक लिहिलं. एका हिशेबानं बघितलं तर दुष्ट लोकांनी उभा केलेला गोंधळ आणि त्यांच्याविषयी माझ्यामध्ये असलेला राग या दोघांचं फळ म्हणजे 'लेट्स किल गांधी' असं मला वाटतं.

**मुलाखत – चेतन शिंदे**

**(मुलाखतीचा उर्वरित भाग नंतरच्या अंकात)**

***



व्यक्तीची ओळख त्याच्या कपड्यांवरून नव्हे, तर चरित्रावरून ठरत असते.



– डॉ. भालचंद्र कांगो



# जय-भीम कॉम्रेड!

आक्रमक होत वाढत चाललेली नवी भांडवलशाही आणि मूलतत्त्ववाद यांनी एकाच वेळी आपल्यासमोर वर्ण आणि वर्ग लढा उभा केला आहे. तो लढून विजयी व्हायचे असेल तर मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी विचारांनी एकत्र येण्याची गरज निर्माण झाली आहे. खरे तर असं ऐक्य यापूर्वीही छोट्या-मोठ्या स्वरूपात वेळोवेळी व्यक्त झालं आहे. आता गरज आहे ती त्याच्याकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची.

देशात २०१४ नंतर ज्या घटना घडल्या त्यात दलित अत्याचाराच्या वाढत्या घटना व त्याविरोधी दलित उद्रेक ही महत्त्वाची घटना होय. संघ समर्थक भारतीय जनता पक्षाचे भारतात राज्य आले म्हणून हा बदल झाला असे म्हणणे अतिशयोक्तीपूर्ण होईल. गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्याच्या समर्थक संघटना व भारतीय जनता पक्ष ज्या प्रवृत्तीला बळ होत होता, खतपाणी घालत होता त्याला नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर जे भौतिक व वैचारिक आधार मिळाले, त्यामुळे झालेले हे बदल आहेत हे समजावून घेणे आवश्यक आहे.

सर्व जगात काही अपवाद वगळल्यास उजवे, वर्चस्ववादी-बहुमतवादी राजकारण वाढते आहे. मागच्या शतकांत अल्पसंख्याकांना बरोबर घेऊन, मानवी हक्काची जाणीव ठेवून समतावादी राजकारण, समाजकारण व अर्थकारण पुढे जात होते. त्याला आता मोठा विरोध होऊ लागला आहे. अल्पसंख्याकांचे लाड, कामगार व कामगार संघटनांची मुजोरी, दादागिरी, शासकीय योजना व मदतीचा गैरफायदा घेणारे लोक खास, भारतीय शब्द म्हणजे ‘सरकारी जावई’ खोटा धर्मनिरपेक्षवाद (सुडो सेक्युलारिझम) अशी वर्णनं व त्याला मिळणारा प्रतिसाद वाढू लागला. नवे आर्थिक धोरणच मुळी समताविरोधी व बाजारपेठेचे वर्चस्व, स्पर्धेला उत्तेजन देणारे आहे. त्याचा मुख्य वैचारिक आधार हा स्पर्धा-मुक्त स्पर्धा, नैसर्गिक असमानता मानून समतेला विरोध करणे, ज्यांच्याकडे आहे त्यांनी ते त्यांच्या



लायकीने व ताकदीने मिळविले आहे अशा प्रकारचे समर्थन होत आहे. समतावादी सोव्हिएतचे पतन हा देखील या विचार-व्यवहाराला मिळालेला मोठा आधार होता याचे भान आज ठेवणे आवश्यक आहे.

दुसरीकडे चंगळवादी प्रवृत्ती व वाढत्या तंत्रसाधनांच्या उपलब्धीमुळे विकासाचा भ्रम मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला. याचा प्रभाव प्रामुख्याने मागच्या शतकांतील मिश्र अर्थव्यवस्था, समाजवादाकडे झुकलेली धोरणे व विचार यांच्यामुळे मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेल्या नवमध्यम वर्गावर झाला. विचाराचा वाहक व समाजातील विचार-व्यवहारावर प्रभाव टाकण्याची या वर्गाची क्षमता याचा परिणामही जाणवत आहे. हा वर्ग मोठ्या प्रमाणावर नवीन आर्थिक धोरणाची फळे मिळवून त्याचा समर्थक होत आहे.

या सर्व बदलांचा परिणाम म्हणजे राजकारण, समाजकारण व अर्थकारणात झालेले मोठे व आव्हानात्मक बदल. त्याचा परिणाम म्हणजे कामगार वर्ग, दलित, अल्पसंख्याक, आदिवासी समूहाच्या चळवळीकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन. चळवळीचा ओसरलेला प्रभाव! याचमुळे आज झुंडशाही व भावनात्मक धर्म-जात-भाषा आधारित आंदोलने वाढून सत्ताबदल होत आहेत, झाले आहेत.

या बदलांना सामोरे जाताना आपले आधार काय याचा विचार समतावादी चळवळीत होत आहे. मानवतावाद, लोकशाही व आर्थिक समता हा मागच्या शतकांत ज्या चळवळीचा तत्त्वज्ञानाचा आधार होता त्या आज जवळ येऊ पाहत आहेत. ती काळाची गरज आहे. भारतातील या विचारांचे मागच्या शतकांतले सर्वांत मोठे समर्थक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे विचार. त्याचा आधार घेऊन वाढलेली दलित चळवळ. दुसरीकडे जगभर या समतावादी विचारांच्या सहाय्याने पसरलेली १९ व २० च्या शतकातील मार्क्सवादी चळवळ. कार्ल मार्क्स व त्याचे विचार यांनी जग हादरून गेले. जगातील श्रमिकांना स्वातंत्र्यासाठी साम्राज्यवादविरोधी स्वातंत्र्यलढ्याला दिलेले बळ

अभूतपूर्व होते व आहे. त्या चळवळीचा प्रभावही भारतात पडला व मोठी चळवळ उभी राहिली.

आज वर्चस्ववादी विचार व व्यवहार वाढत असताना त्याचा मुकाबला करण्यासाठी भारतात दलित चळवळीचे प्रेरणास्थान म्हणजे आंबेडकरवाद व श्रमिकांचे प्रेरणास्थान 'मार्क्सवाद' यांच्यात सुसंवाद, सामंजस्य निर्माण होत आहे. ती एक ऐतिहासिक गरज आहे. त्यामुळेच 'जेएनयू'चा विद्यार्थी नेता 'कन्हय्याकुमार' याने दिलेली ''जय भीम-लाल सलाम'' ही घोषणा तरुण मनाला भावत आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली अनेक डाव्या व परिवर्तनवादी संघटनांनी, जातीय मागण्या वाढण्याच्या काळात उभी केलेली ''जातीअंताची चळवळ'' देखील याच विचार-व्यवहाराच्या जगात जात व वर्ग संघर्ष एकत्र आणण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्नच आहे.

या आधीही कॉ. अण्णा भाऊ साठे यांनी 'जग बदल घालूनी घाव सांगून गेले मजला भीमराव' या घोषणेतून व दलित साहित्याच्या पहिल्या अध्यक्षीय भाषणातून याची गरज सांगितली होतीच. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३२ मध्ये मजदूर पक्षाची केलेली स्थापना ही त्याच दृष्टिकोनातून उचललेले पाऊल होते. कर्मवीर दादासाहेब गायकवाड व किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे खासदार क्रांतिसिंह नाना पाटील यांनी आपल्या 'भूमिहिनांच्या मुक्तिलढ्यातून' हाच वर्ग-वर्ण लढा एकत्र गुंफण्याची क्रिया केली होती.

भूमिहिनांचा लढा, गायरानाचा लढा, विद्यापीठ नामांतर लढा, दलित पँथरचा लढा अशा अनेक लढ्यांतून आपणास ही श्रमिक दलित युती प्रकर्षाने दिसली होती. त्यामुळे मार्क्स व डॉ. आंबेडकर यांच्या विचारांना बरोबर घेऊन जाण्याचे धोरण व मागणी ही आताची नाही तर ती परिस्थितीनं निर्माण केलेली आहे. ते भारतातील एक वास्तव आहे! परंतु वर्चस्ववादी शक्तींना ही युती धडकी भरवीत असल्यामुळे जाणीवपूर्वक आंबेडकरवाद व मार्क्सवाद यांच्यामध्ये दुही निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यात जातीमधील वर्ग निर्माण झाल्यामुळे भर पडली आहे. आपले वर्गीय हितसंबंध जपण्यासाठी, समझोत्यासाठी जातीवरच भर देऊन स्वहित जपण्याची ही खेळी आहेच.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ व भारतातील मार्क्सवादी चळवळ एकाच वेळी व एकाच प्रदेशात आणि प्रामुख्यानं मुंबईत त्यांचे प्रभावाचे क्षेत्र समानच होते. त्याचा परिणाम या दोन विचारसरणींच्या कार्यकर्त्यांमध्ये स्पर्धा होण्यात, एकमेकांवर टीका करण्यात झाला. याचाच फायदा घेऊन आज कार्यरत असलेल्या समता व लोकशाहीविरोधी शक्ती (ज्यात भाजप व संघ समर्थक संघटना आघाडीवर आहेत.) व स्वहितालाच महत्त्व देण्याच्या जातीमधील वर्गीय शक्ती व्यवहार करीत आहेत.

याचा मुकाबला करण्यासाठी महाराष्ट्रात पुरोगामी विचारवंत व डाव्या पक्षांनी पुढाकार घेऊन गेली दोन वर्षे महाराष्ट्रात आंबेडकर विचार संमेलन व नंतर मार्क्स, गांधी, आंबेडकर विचार संमेलन आयोजित करून प्रबोधनाचे काम करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे. अर्थात सतत होणाऱ्या व येऊ पाहणाऱ्या निवडणुका व त्यासाठी घेतल्या जाणाऱ्या तत्कालीन भूमिका व डावपेच यामुळे या प्रबोधनातील अडचणी वाढत आहेत. त्याची धार बोथट होत आहे. परंतु आंबेडकरवाद वा मार्क्सवाद हा परिस्थितीला शरण न जाता मानवी वृत्तीवर, लोकशाही, विज्ञाननिष्ठ, समता या मूल्यांच्या आधारावर नवीन समाज घडविण्यासाठी भर देतो. म्हणूनच वर्ग व जात संघर्ष एकत्र पुढं नेण्याची हाक देत आहे. त्याला सच्चे मार्क्सवादी व आंबेडकरवादी 'साद' देत आहेत. त्यात वाढत्या विषमतेमुळे निर्माण होणाऱ्या समजाव्यवस्थेची ही हाक आहे. भारतात चार्तुर्वण्य व्यवस्था कमजोर होत आहे. त्यासाठी संघर्ष चालू आहे. परंतु त्याचबरोबर नवीन द्विवर्ण पद्धत स्थिर होऊ पाहत आहे. १८ टक्के विरुद्ध ९ टक्के अशी ही लढाई आहे. या लढाईत वर्ग जागरूकता व वर्गलढा प्रमुख आधार आहे. त्यामुळेच भारताच्या आजच्या स्थितीत जात संघर्ष व वर्ग संघर्ष याचे एकत्र येणे ही परिवर्तनाची गरज आहे. परिवर्तनाचा तो आधार आहे. जात अस्मिता व भावना प्रबळ करून या युतीला छेद देण्याचा प्रयत्न होणार व होत आहे. त्याला उत्तर म्हणून फक्त वर्ग संघर्षच असे पूर्वीचे उत्तर आत्मघातकी व आत्मवंचना करणारे ठरेल हे पण लक्षात घ्यावे.

***




– डॉ. सुरेश खैरनार,
अध्यक्ष, राष्ट्रीय सेवा दल



*२०१९ हे गांधीजी व कस्तुरबांचे १५०वे जन्म वर्ष येत असून, २ ऑक्टोबर २०१८ ते २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत दीडशेवी जयंती साजरी होणार आहे. गांधींची समस्त मानवजातीसाठी सर्वांत मोठी देणगी 'सत्याग्रह'! सत्याग्रहाबाबतीत भक्त प्रल्हाद वा सॉक्रेटिसचेही योगदान आहे; पण अलीकडच्या इतिहासात सर्वांत ताजे उदाहरण महात्मा गांधींचेच आहे! एक साधारण माणूस कुठल्याही संघटनेशिवाय सत्तासंपत्ती नसलेला, आपल्यावर झालेल्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात सत्याग्रह करू शकतो! संपूर्ण विश्वातील अलीकडच्या दोनशे वर्षांच्या राजकीय, सामाजिक चळवळींना ही अनुपम देणगी गांधीजींनी दिलेली आहे. यात अहिंसेचे पालन ही पूर्वअट आहे.*

# मला उमजलेले गांधी


सविनय कायदेभंग ही चळवळ डॉ. राममनोहर लोहिया यांच्या भाषेत सिव्हिल नाफरमानी (Civil disobedience Movemet) किंवा साधारण मराठीत सविनय कायदेभंगाची चळवळ ज्याचा गांधीजींनी ११ सप्टेंबर १९०६ ला दक्षिण आफ्रिकेतील भारतीय वंशाच्या लोकांवर लादल्या गेलेल्या अन्यायी कायद्याच्या विरोधातून जन्म झाला. त्यानंतर अकरा वर्षांनी १९१७ मध्ये चंपारणच्या तिनकठीया प्रथेच्या विरोधात बारडोली खेडा व नंतर स्वातंत्र्य चळवळीत सत्याग्रहाचा विकास झाला. एकीकडे अण्वस्त्रे व इतर संहारक शस्त्रे असताना सत्याग्रह या शस्त्राचा शोध म्हणजे आधुनिक जगाला; मुख्यतः गरीब, साधनहीन, दलित, शोषित, अन्याय, अत्याचाराने पिचत असलेल्या लोकांसाठी फार मोठी देणगीच उपलब्ध झाली! एका नव्या अहिंसक शस्त्राचा शोध! जिचा दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषी सरकारच्या विरोधात आफ्रिकन काँग्रेसने प्रभावीरीत्या वापर करून स्वातंत्र्य संपादन केले. तसेच, मार्टिन ल्यूथर किंगने अमेरिकेतील काळ्या-गोऱ्या वादामध्ये याच मार्गाचा अवलंब केला. सुरुवातीचे सर्वांत महत्त्वाचे अरबस्प्रिंग नावाने इजिप्त,



माणूस हा त्याच्या विचारानेच मोठा होत असतो. कारण तो जो विचार करतो, तेच बदलाच्या स्वरूपात पुढे येत असते.


ट्युनिशिया इत्यादी राष्ट्रांत २०१०-२०१२ दरम्यान जुलमी राजवटीच्या विरोधात अरेबिकमधील गांधींच्या सत्याग्रह, असहकार, सिव्हिल नाफरमानी इत्यादींवरील मजकूर सोशल मीडियाद्वारे एकमेकांना पाठवून तेथील लोकांनी उठाव केला.

मी भारत पॅलेस्टाईन एकता संघाच्या भारतीय शाखेचा अध्यक्ष असल्यामुळे खालील काही घटनाक्रमांचा मी साक्षीदार आहे. 'तहरीर स्क्वेअर' या कैरोतील जगप्रसिद्ध सत्याग्रहाची मला योगायोगाने गाझा पट्टीतून परतत असताना जानेवारी २०११ मध्ये थोडी झलक पाहायला मिळाली. पॅलेस्टाईनच्या लढाईतील सध्याचे यासर अराफांच्या मृत्यूनंतरचे सर्वांत जास्त प्रभाव असलेले व सध्या भूमिगत असलेले नेते खालीद मिशाद दमास्कसला भेटायला आले असता दोन तासांच्या भेटीत त्यांनी दहा वेळा महात्मा गांधींचे नाव घेतले. ते अरबी भाषेत बोलत होते. दुभाष्याकडून झालेले भाषांतर त्यांना समाधानकारक न वाटल्याने त्यांनी स्वतः हस्तक्षेप करून मोडक्यातोडक्या इंग्रजीतून आमचा लढा गांधीजींच्या सत्याग्रह मार्गानेच चाललेला असून, आमची पॅलेस्टाईन मुक्तीची लढाई चालू असून, आम्हाला एक दिवस स्वातंत्र्य जरूर मिळेल असा आशावाद व्यक्त केला. त्यांच्या म्हणण्यात तथ्य वाटले; कारण इस्राईलने चारही बाजूंनी २५-३० फूट उंचीच्या भिंतींनी गाझा वेस्ट बॅंक, जेरुसले या सर्व ठिकाणी अरबी वस्तींना तुरुंगासारखे कोंडून ठेवले आहे. तसेच टेहळणीसाठी टॉवर्स उभारल्याने सशस्त्र उठावाला फारसा वाव नाही ही वस्तुस्थिती आम्ही २०१० च्या शेवटच्या दिवशीपासून २०११ च्या पहिल्या आठवड्यात आम्ही गाझामध्ये एक आठवडा राहून आलेलो आहोत. एकूण गाझापट्टी दहा-पंधरा लाखांची वस्ती असून, गाझाच्या इलेक्ट्रिसिटीपासून पाणी, दळणवळणाची साधने, गाझाचा समुद्र (कॅस्पिअन सी) हे सर्व इस्राईलच्या ताब्यात असून, त्यांचा एकमेव एअरपोर्ट व पोर्ट दोन्ही उद्‌ध्वस्त करून ठेवले असून, गाझाला दळणवळणासाठी इजिप्तच्या सीमेवरच्या चिंचोळ्या 'बॉटल नेक'सारखा 'रफाह' हा एकमेव मार्ग जगासोबत दळणवळणासाठी उपलब्ध असून, तोही इजिप्त हे अरब राष्ट्र असून, गाझाच्या रहिवाशांसोबत इजिप्तचा व्यवहार अत्यंत अमानवी आहे. त्याचा काही



प्रमाणात आम्ही स्वतः अनुभव घेतला आहे. ६ जानेवारी २०११ रोजी गाझापट्टीतून कैरो एअरपोर्टवर येण्यासाठी रफाह बॉर्डरवर झालेली आमची तपासणी व त्यानंतर कैरो एअरपोर्टवर पोहोचल्यावर इजिप्तच्या सुरक्षारक्षकांचा वेढा आमच्या बसेसना पडला व आमचे विमान सुटेपर्यंत आम्हाला कैद्यांसारखी वागणूक देण्यात आली. त्याबद्दलचा निषेध आम्ही कैरो एअरपोर्टवर आमच्या सामानाच्या ट्रॉल्या इतरत्र फेकून 'हुस्नी मुबारक मुर्दाबाद', इजिप्त सरकारचा निषेध करून आमची विमाने तिथे येईपर्यंत आम्हाला मिळालेल्या अपम नास्पद वागणुकीचा आमच्या पद्धतीने प्रतिकार केला. त्याआधी गाझापट्टीवर प्रवेश करण्याचाही अनुभव काही फार सुखद नाही. रफाह नावाचे वाळवंटातील इजिप्तचे शेवटचे छोटेखानी बंदरवजा शहर आहे. तेथे जातानाही आम्हाला अपमानास्पद वागणूक मिळाली. आम्ही तेथे सुतकताई करून चळवळीची वेगवेगळी गाणी म्हणत 'अलअरिष'च्या एअरपोर्टवर मिरवणूक काढली व आम्ही आमचा प्रतिकार दर्शविला असता प्रशासनाने आमची गाझापट्टीकडे जाण्याची व्यवस्था केली. जाताना व येताना इजिप्तच्या विरोधातील प्रतिकार हे गांधीजींच्याच शिकवणुकीनुसार आम्ही केले असल्याने त्याचा काही प्रमाणात परिणाम झाल्याचे अनुभवास

स्वत:ला ओळखण्याचा सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे स्वत:ला इतरांच्या सेवेत व्यस्त ठेवा.



आले. कावळा बसायला व फांदी तुटायला जसे निमित्त होते तसाच आमचा हा इजिप्तमध्ये प्रतिकाराचा प्रयत्न होऊन एक आठवडाही झाला नसेल तर कैरोतील प्रसिद्ध तहरीर स्क्वेअर येथे तंबूसहित व बायकांसहित राहुट्या ठोकून बसले. हुस्नी सरकारने चारही बाजूंनी रणगाडे लावून वेढा दिला; पण तरीही इजिप्तची जनता निर्भयपणाने गांधीजींच्या मार्गाने सत्याग्रह करीत बसली व हुस्नी मुबारकसारख्या हुकूमशहाला पायउतार होण्यास भाग पाडले. या संपूर्ण चळवळीच्या मागे अरेबिक भाषेतील सत्याग्रही महात्मा गांधी हा अरबस्प्रिंगच्या उठावामागील महत्त्वाची प्रेरणा होती. बहुसंख्य अरबस्प्रिंगम ध्ये येनपासून इजिप्तपर्यंत सत्याग्रहाच्या मार्गाचे उठाव झालेले आहेत.

सध्या इस्त्राईलच्या तुरुंगामध्ये असलेले पॅलेस्टिनी कैद्यांनी आपल्या मागण्यांसाठी दीर्घकाळ उपवास करून आपल्या मागण्या पदरात पाडून घेतल्याचे उदाहरण आम्ही पाहून आलो आहोत! कमी-अधिक प्रमाणात संपूर्ण जगातच गांधींचा मार्ग अवलंबत असलेले पाहतोय. मागे अमेरिकेतील आर्थिक मंदीच्या विरोधात ऑक्युपाय वॉलस्ट्रीट नावाने झालेले आंदोलन तरी काय होते? आपली लहान बाळे बेबी सिटरमध्ये घेऊन तंबू ठोकून साधारण अमेरिकन नागरिक ज्यात काळे-गोरे व इतर वंशाचेही लोक होते. रात्रंदिवस ठाण मांडून होते. भारतातदेखील नर्मदा बचाव आंदोलनापासून कैक विकासाच्या वर्तमान अवधारणेच्या विरोधात सुरू असलेली आंदोलनं तरी काय आहेत? ३० वर्षांपेक्षा जास्त काळापासून सुरू असलेली विभिन्न जनआंदोलने शांततामय पद्धतीने सुरू असून, काहींना अंशत: यशदेखील मिळाले आहे. एकूण शस्त्रास्त्रांच्या स्पर्धेमध्ये कमी-अधिक प्रमाणात प्रचंड प्रमाणात नवनवीन संहारक शस्त्रास्त्रांची भर पडत असून, सशस्त्र लढ्याची युद्धनीती म्हणून पण शक्यता दिवसेंदिवस कमी होत चालली असून, काही मूठभर लोकांच्या सशस्त्र लढ्यांची धार हळूहळू बोथट होत चाललेली दिसत आहे. बंदुकीच्या नळीतून क्रांती जन्म घेते हे वाक्य लिहिणाऱ्याला तेव्हा माहीत नव्हते की भविष्यातील बंदूक किती संहारक असेल? आज बंदूक व शस्त्रास्त्रांचा झालेला तथाकथित विकास पाहून कुणीही सुजाण असल्या घोषणांच्या नादी लागणार नाही. म्हणून महात्मा गांधींनी शोधलेले अमोघ असे सत्याग्रहाचे शस्त्रच सर्वांत प्रभावशाली होण्याची गरज आहे.

३० जानेवारी १९४८ रोजी सांप्रदायिक विचाराच्या लोकांनी गांधीजींची हत्या केली. गांधीजींची १५० वी जयंती म्हणजे त्यांच्या मृत्यूच्या ७० वर्षांनंतर या देशात सांप्रदायिक विचाराची मंडळी भारतात विविध ठिकाणी सत्तेपर्यंत येऊन पोहोचली आहे. अलीकडे देशभर एक उन्मादी वातावरण बनविण्याचा प्रयत्न काही संघटना जाणीवपूर्वक करीत आहेत. अशात राष्ट्र सेवा दल ही संघटना गांधीजींच्या विचारांना आदर्श मानून काम करित आहे. गांधीजींनी दिलेले सत्याग्रह, सर्वधर्मसमभाव व विकासाच्या अवधारणेच्या संदर्भात त्यांनी हिंदस्वराज्यमध्ये ११० वर्षांपूर्वी उपस्थित केलेले मुद्दे जास्तीत जास्त लोकांपर्यंत वेगवेगळ्या माध्यमांद्वारे नेणे हा सेवादलाचा प्रमुख हेतू असेल.

***

**द पीपल्स पोस्ट ची वर्गणी बँक ट्रान्सफरने भरण्यासाठी तपशील**

बँक :- स्टेट बँक ऑफ इंडिया, समर्थ नगर शाखा, औरंगाबाद.

खाते :- द पीपल्स पोस्ट

खाते क्र :- ३७८५६३७३४१९

आयएफएससी क्र :- SBIN0007919

एमआयसीआर क्र :- ४३१००२०१०


टीप :- पैसे ट्रान्सफर केल्यानंतर ७३५००९१५६९ या क्रमांकावर एसएमएसद्वारेअथवा thepeoplespost2014@gmail.com या ईमेलवर कळवावे.

**वार्षिक वर्गणी :- ५०० रू.**

**सहामाही वर्गणी :- ३०० रू.**

चेक/डीडी **''द पीपल्स पोस्ट''** या नावाने व्यवस्थापक **'द पीपल्स पोस्ट'** कार्यालय सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेट जवळ, औरंगाबाद- ४३१००१ या पत्त्यावर पाठवावेत.





## मुलाखत

**“आपल्या घरांच्या भिंतीवर लिहून ठेवा की, तुम्हाला शासनकर्ते बनायचे आहे” हे बाबासाहेबांचे विचार मनावर असे कोरले गेले की, मी माझे ध्येय गाठण्यासाठी कष्टालाच सोबती केले. या दरम्यान यश–अपयशाचा सामना करावा लागल्याने तणावात जाण्याचे प्रसंगही उद्भवले, पण तथागत गौतम बुद्धांच्या विचारांनी मला सावरले. मुंबई ‘जेएनसीएच’चे अतिरिक्त आयुक्त निखिल मेश्राम यांचा विद्यार्थी ते प्रशासकीय अधिकारी हा प्रवास समजून घेणारी मुलाखत.**

# नव्या आव्हानांना झेलन्यात आनंद...

**प्रश्न : तुमची कौटुंबिक पार्श्वभूमी काय होती. एक विद्यार्थी ते अधिकारी कसा प्रवास सुरू झाला?**

**मेश्राम :** माझं प्राथमिक शिक्षण चंद्रपूरला झालं. अलाहाबादला इंजनिअरिंग कॉलेज पूर्ण केलं. त्यानंतर इंजिनिअरिंग सर्व्हिसेसच्या परीक्षेची तयारी सुरू केली. ही तयारी चालू असताना मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड मॅनेजमेंट स्टडीज् इन्स्टिट्यूट दीक्षाभूमी येथून मार्केटिंग व फायनान्समध्ये एमबीए पूर्ण केले. लोक प्रशासन व डॉ. आंबेडकर थॉट्स या दोन्ही विषयांत एम.ए. पूर्ण केले असून, एलएलबी अपूर्ण आहे. ती पूर्ण करायची इच्छा आहे. डॉ. बाबासाहेबांनी शिकण्याचा संदेश दिलेला आहे. तो सर्वांनीच स्वीकारायला पाहिजे.

**प्रश्न : तुम्ही रात्रशाळेत पण शिकलात. काय अनुभव होता तो?**

**मेश्राम :** इंजिनिअरिंग झाल्यानंतर मी सिव्हिल सर्व्हिसेसची तयारी करत होतो. शिवाय पुढे शिकायचे हा विचार मनात होता म्हणून मी नाईट कॉलेज करून पुढचे शिक्षण सुरू ठेवावे हे ठरवले. तिथे गेल्यानंतर हे लक्षात यायचे की, लोक किती अडथळ्यात जगत असतात. त्यांचे प्रश्न किती असतात, याची जाणीव व्हायची. ती जाणीवपण सिव्हिल सर्व्हिसेसची जोरात तयारी सुरू करण्यासाठी कामी आली.

**प्रश्न : यामागची प्रेरणा काय होती? अभ्यासादरम्यानच्या काही आठवणी आहेत का?**

**मेश्राम :** सगळ्यात मोठी प्रेरणा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची. डॉ. बाबासाहेबांनी म्हटलं होतं, ‘आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की, तुम्हाला शासनकर्ते बनायचे आहे’. ते कुठे तरी मनामध्ये होतं. या जाणिवेतून मी अधिक गंभीर अभ्यास केला. यात घरातील मंडळींनी मला पूर्ण पाठबळ दिले. मित्रमंडळींत डॉ. हर्षदीप कांबळे, विजय वाघमारे, संदीप तामगाडे, सचिन शेंडे, राजेश कांबळे, नागसेन बागडे ‘एकमेकांना सहाय्य करू’ या पद्धतीने एकत्र अभ्यास करायचो. खूप तासन्‌तास अभ्यास केला. कधी कधी मध्येच निकाल समाधानकारक आला नाही तर डिप्रेशनमध्ये जायचो. तेव्हा डिप्रेशनमधून बाहेर पडण्यासाठी तथागत बुद्धांच्या विचारांची मदत व्हायची. डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेकडे पाहिल्यानंतर डिप्रेशनमधून बाहेर पडण्यासाठी पाठबळ मिळायचे. मी अनेक वेळा अंधश्रद्धेपोटी नव्हे तर एक वेगळीच ऊर्जा बाबासाहेबांच्या प्रतिमेसमोर उभे राहिल्यानंतर मिळायची. म्हणून त्यांच्या प्रतिमेसमोर उभा राहायचो. बाबासाहेबांच्या तेजस्वी चेहऱ्याकडे पाहिल्यानंतर त्यांचे कष्ट आणि परिश्रम डोळ्यासमोर यायचे आणि त्यातून सर्वांत मोठी प्रेरणा मिळायची.

**प्रश्न : या परीक्षेत कधी यशस्वी झालात आणि पहिली पोस्टिंग कुठे झाली आणि काय अनुभव राहिला?**

**मेश्राम :** सुरुवातीला २००१ मध्ये रेल्वे सर्व्हिसेससाठी निवड झाली होती, त्यानंतर भारतीय रेव्हेन्यू सर्व्हिसेससाठी निवड झाली. भंडाऱ्यानंतर दोन महिन्यांत नागपूरमध्ये माझी पोस्टिंग झाली. जवळपास मी सहा वर्षे तिथे होतो. या सहा वर्षांत मी सर्व विभागांत काम केले. नागपूरमध्ये जे इंटरनॅशनल एअरपोर्ट झालं, तिथे मी खूप काम केले. नागपूरमध्ये महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनीत निहान एसईझेड या स्पेशल प्रोजेक्टचा पहिला स्पेसिफाईड ऑफिसर म्हणून काम करता आले. खूप चांगले काम करता आले. खूप काही शिकायला मिळाले.

**प्रश्न : मुंबईतील कामाचा काय अनुभव सांगाल?**

**मेश्राम :** मुंबईतील पहिली पोस्टिंग इन्स्पेक्शन डिपार्टमेंटमध्ये झाली होती. वेगवेगळ्या कमिशनरेस्ट ऑर्गनायझेशनचं इन्स्पेक्शन त्या ठिकाणी केलं जात होतं. त्यानंतर मी दिल्लीला प्रशासकीय विभागात वेगवेगळे प्रश्न कसे सोडवतात हे शिकायला गेलो. त्यासाठी निवडक लोकांची एक टीम बनवण्यात आली होती. तिथूनच कलकत्ता, मँगलोर, जयपूरसह देशातील वेगवेगळ्या ठिकाणी आमच्या खात्याचे काम करता आले. त्याचा जाहीर उल्लेख करणे योग्य नाही; पण चांगले काम करता आले.

**प्रश्न : तुमच्याकडे एकाच वेळी ४ ते ५ विभागांचा पदभार होता. एकाच वेळी एवढ्या ठिकाणी काम करणे कसे शक्य झाले?**

**मेश्राम :** माझ्याकडे कधीच एक चार्ज राहिलेला नाही, नेहमीच ३-४ चार्जेस असायचे. आमच्या मुख्य आयुक्तांच्या आदेशाने आम्हाला ॲन्टीस्मगलिंगचे काम राज्यामध्ये सुरू करायचे होते, ते केले. जवळपास रात्री १२ पर्यंत ते काम चालायचे. सकाळी १० पासून रात्री १२ पर्यंत काम केले. कार्यालयातील कामानंतर जी टीम धाड टाकायला जात असे त्या टीमच्या कामात सहभागी व्हावे लागत असे. त्यानंतर रात्री एअरपोर्ट येथील कार्यालयात थांबावे लागत असे. या विभागात रोज नवनविन आव्हानांना सामोरे जावे लागत असे. अनेक प्रकारच्या केसेस कराव्या लागत. रोज नविन आव्हाने झेलण्यात मला मनस्वी आनंद वाटायचा. म्हणुन आयुक्त नेहमीच माझं कौतुक करत असत. माझ्यावर ते खूप विश्वासही करत होते. जबाबदारीचे काम नेहमी सोपवलं जायचं, मी ते करायचो. मला वरिष्ठांचा कायमच पाठिंबा मिळत गेला आहे. दोन वेळा वरिष्ठांनी प्रमाणपत्र देऊन गौरवही केला. शिवाय, वेगवेगळ्या कारवाईत सहभागी होऊन शासनाचा फायदा करून दिल्याबद्दल पाच वेळा विशेष पारितोषिक मिळाले आहे. पारितोषिकापेक्षाही मला काम करता आले याचा आनंद खूप आहे.

**प्रश्न : प्रशासनात असताना एखादा कठीण प्रसंगाचा अनुभव?**

**मेश्राम :** ॲन्टीस्मगलिंगच्या संबंधाने केलेली कारवाई आहे. तशा तर खूप छोट्या-मोठ्या केसेस आहेत. नागपूरमध्ये आम्ही एक केस केली होती. मी त्या केसच्या खोलात जाऊन त्या व्यक्तीची चोरी पकडली होती आणि सरकारकडे मोठा कर भरायला लावला होता. एकदा विदेशातून मोठ्या संख्येने आलेल्या भंगाराच्या कंटेनरमध्ये मोठ्या प्रमाणात दारूगोळा पकडला होता. कस्टममध्ये नोकरी करत असताना रोज नव्या नव्या आव्हानांना सामोरे जावे लागत असते. वेगवेगळ्या प्रकारची माणसं तिथे पाहायला, अनुभवायला मिळतात. नागपूरमध्ये कस्टमचा अधिकारी म्हणून काम करत असताना देश-विदेशातील खूप विमाने नागपूरमध्ये येत असत. तेव्हा फार जागृतपणे तिथे काम करावे लागत असे. खूप आठवणी आहेत पण त्या नियमाने सांगता येणार नाहीत.

**प्रश्न : मुंबईत अतिरिक्त आयुक्त म्हणून काम करत असतानाचा काय अनुभव आहे?**

**मेश्राम :** जेव्हा मी अतिरिक्त आयुक्त झालो तेव्हा मोठ्या प्रमाणात प्रशासकीय काम करता आले. प्रमोशनच्या संबंधाने मोठे काम करता आले. वेगवेगळ्या संघटनांचा जवळून संबंध आला. या सर्व प्रकरणात खूप काम करावे लागले याचे खूप समाधान आहे. संघटना कशा चालवल्या जातात हे जवळून पाहता आले. या दरम्यान पदोन्नती आणि कॅडरल स्ट्रक्चरिंगचे काम जवळपास १८ दिवस २४ तास चालले होते. तेव्हा मी अनेक वेळा दिवसरात्र ऑफिसला बसून काम केले. जेव्हा की, माझ्या पदाच्या प्रशासकीय दर्जानुसार मला ऑफिसमध्ये थांबण्याची आवश्यकता नव्हती; मात्र सहकारी अधिकाऱ्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि समाधानकारक काम करता यावे यामुळे मी या कामात पूर्णपणे झोकून दिले होते. मी महाविद्यालयात शिकत असताना विद्यार्थी निवडणुका लढवायचो. इतरांना मदत करायचो. या दरम्यान मी वेगवेगळ्या विषयांची खूप पुस्तकं वाचली होती. कुठेही प्रवासात, कार्यक्रमात गेलो तरी सोबत पुस्तकं असायची. त्या सर्वांचा अनुभव प्रशासनात कामी आला.

**प्रश्न : तुम्ही सामाजिक कार्यात सहभाग घेता. तरुणांना उद्योगाविषयी मार्गदर्शन करता, असे समजणे काय सांगाल याविषयी?**

**मेश्राम :** डॉ. बाबासाहेबांनी शिकले सवरलेल्या लोकांवर सामाजिक कार्याची जबाबदारी सोपवली आहे. त्या जाणिवेतून समाजातील गरीब, वंचित तरुणाना शिक्षणासाठी, उद्योग-व्यवसायासाठी, त्यांना योग्य दिशेने घेऊन जाण्यासाठी शक्य होईल ती मदत करणे ही कामं मी करत असतो. केलेल्या कामाची प्रसिद्धी करावी ही गोष्ट मला मुळात आवडत नाही. आमचे डॉ. हर्षदीप कांबळे हे एक मित्र आहेत. ते महाराष्ट्राच्या उद्योग विभागाचे विकास आयुक्त असून, त्यांनी शासनाच्या उद्योग-व्यवसायाच्या संबंधी खूप चांगल्या योजना राबवायला सुरुवात केली आहे. राज्यातील सर्व समाजाच्या तरुणांसाठी ते उद्योजकविषयी मार्गदर्शन करणाऱ्या कार्यशाळा आयोजित करतात. मी स्वतः इंजिनिअरिंग केले आहे. मार्केटिंग आणि फायनान्समध्ये एमबीए केलं आहे. सुरुवातीला कधी काळी उद्योग-व्यवसाय करावा असा विचारही मनात येऊन गेला होतो. पण स्पर्धा परीक्षा आणि त्यातून व्यापक दृष्टिकोनातून समाजहिताचे काम करता येऊ शकते. त्या जाणिवेने ते राहून गेले. आज त्या संबंधातील असलेली माहिती इतरांना सांगावी याच उद्देशाने मी तरुणांना उद्योग-व्यवसाय कसा करावा यासंबंधीची माहिती देत असतो. मी ज्या विभागात काम करतो ते देशातील जल वाहतुकीचे सर्वांत मोठे दळणवळणाचे साधन आहे. तेथून देश-विदेशात जलवाहतुकीने उद्योग-व्यवसाय करता येऊ शकतो, या संबंधीच्या संधी आहेत. इम्पोर्ट-एक्सपोर्टचे काम या विभागातून केले जाते. तेव्हा बरीचशी उद्योगासंबंधीची माहिती मिळत राहते, ती तरुणांना सांगत असतो.

**प्रश्न : तुमच्या विभागातून व्यापारवाढीच्या काही संधी आहेत का?**

**मेश्राम :** आपला देश ही जगातील सगळ्यात मोठी बाजारपेठ आहे. आज जगातील वेगवेगळ्या कंपनीज् आपल्या देशात उद्योग-व्यवसाय करण्यासाठी येत आहेत. भारताच्या पूर्व इतिहासात डोकावल्यानंतर सम्राट अशोकाच्या काळात आपल्या देशाचा जीडीपी जवळजवळ ३० टक्क्यांच्या वर होता. तो व्यापार करूनच वाढला होता. तेव्हाच्या दळणवळणाच्या साधनांकडे पाहिल्यास जहाजांच्या मार्गानेच तो जास्तीत जास्त वाढल्याचे लक्षात येईल. आजही तसाच तो वाढवता येऊ शकतो. आपल्या देशाच्या पंतप्रधानांनी जीडीपी वाढवण्यावर भर दिला आहे. जलवाहतुकीवर लक्ष केंद्रित केले आहे. आज जगात कोणत्याही देशात, कोणत्याही स्वरूपाचा व्यवसाय करण्याच्या संधी उपलब्ध असून, जलवाहतुकीतून व्यापार ही एक सर्वांत मोठी संधी आहे. तरुणांनी जगाच्या बाजारपेठेचा अभ्यास करून भारतीय जलवाहतुकीचा पुरेपूर फायदा घ्यायला पाहिजे. यासाठी शासनानेदेखील वेगवेगळ्या योजना जाहीर केलेल्या आहेत. पूर्वी कस्टम, सेंट्रल एक्ससाईज, सर्व्हिस टॅक्स याच्या आडून व्यापारी वर्गाची धावपळ व्हायची. आता मात्र सरकारने यात बरीचशी धावपळ कमी केली आहे. उद्योग-व्यवसाय वाढविण्यासाठी आता खरी संधी उपलब्ध करून दिली आहे.

**प्रश्न : मुंबईतील बऱ्याच सामाजिक कार्यक्रमांत तुमचा सहभाग दिसून आला आहे?**

**मेश्राम :** अगोदर म्हटल्याप्रमाणे आपण ज्या परिस्थितीतून पुढे आलो आहोत त्याची जाणीव ठेवूनच पुढे गेले पाहिजे,



या मताचा मी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यात सर्वकाही मिळवण्याची संधी दिली आहे. आज त्यांच्यामुळे एक यशस्वी माणूस म्हणून जीवन जगत आहोत. इतरांनाही माणूस म्हणून जगण्याची संधी मिळाली पाहिजे, या भावनेतून मी सामाजिक कार्यात सहभागी होतो. मुंबईतील काही मित्रांनी एकत्र येऊन गरीब समाजातील मुला-मुलींसाठी स्पर्धा परीक्षा केंद्र चालवण्याची भूमिका मांडली. त्यात मी प्राधान्याने सहभाग नोंदवला. आज कल्याण येथे एक उत्तम स्पर्धा परीक्षा केंद्र काही मित्रांच्या सहकार्याने आम्ही चालवत आहोत. यात शासनाचा एक रुपयाही घेतलेला नाही. महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी, त्यांच्या विचारांचा जागर, मुलांना सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या पुढे आणण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबवणे यांसारख्या कार्यक्रमात सहभाग नोंदवतो. शक्य असेल ती मदत करतो.

**प्रश्न : प्रश्न कौटुंबिक आहे. नुकतेच आपल्या आईचे 'झुंज वेदनांची' हे पुस्तक प्रकाशित केले आहे. त्या पुस्तकाविषयी थोडक्यात काय सांगाल?**

**मेश्राम :** माझी आई एक उत्तम लेखिका, कवयित्री आहे. तिने डॉ. बाबासाहेबांचं संपूर्ण जीवनचरित्र नीटपणे समजून घेतलं आहे. माझी आई प्राथमिक शाळेची शिक्षिका होती. तिच्या शिक्षक बनण्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेबच होते आणि माझ्या अधिकारी बनण्याची प्रेरणासुद्धा डॉ. बाबासाहेबच आहेत. आईने तथागत बुद्धांचं जीवनचरित्र नीटपणे समजून घेतल्यानंतर त्यांनी दिलेल्या संदेशावर चालण्याचा प्रयत्न केला. तिनेच प्रेम, मैत्री, करुणा, बंधुभाव ही सर्वोत्तम मूल्यं आमच्या मनात रुजवली. दुर्दैवाने २००४ मध्ये माझ्या आईला ब्रेस्ट कॅन्सर झाल्याचे निदान झाले. त्यावेळी मी मुंबईत आणि माझी पत्नी रामटेक येथे नोकरीच्या निमित्ताने होती. दोघांचीही प्रचंड धावपळ व्हायची. त्यात आईचा जीवघेणा आजार जेव्हा लक्षात आला तेव्हा आम्ही सर्वजण हादरून गेलो. नेहमीप्रमाणे मी बाबासाहेबांच्या प्रतिमेसमोर उभा राहून, डोकं शांत ठेवून या संकटातून बाहेर पडण्याचा विचार केला. चांगल्या डॉक्टरांशी विचारविनिमय करून उपचाराला सुरुवात केली आणि त्यात यशस्वी झालो. २०१८ला आई कॅन्सरच्या आजारातून पूर्णपणे बरी झाली. जीवनात प्रचंड मोठा आनंद झाला आहे. जे करतो त्याचे फळ मिळाले असे वाटत आहे.

**प्रश्न : या संकटाच्या काळाला तुम्ही कसे सामोरे गेलात?**

**मेश्राम :** हे संकट खूपच मोठं होतं. या दरम्यान अनेक वेळा डिप्रेशनमध्ये गेलो पण आईचा आशीर्वाद, तिने मनावर रुजवलेला तथागत बुद्धांचा व बाबासाहेबांचा विचार यामुळे त्यातून बाहेर पडायचो. आईसुद्धा तथागत बुद्धांच्या विविध गाथा, बुद्ध तत्त्वज्ञानावर आधारित असलेली वेगवेगळी पुस्तकं यांचं वाचन करत होती. त्यातून तिने बऱ्यापैकी स्वतःला सावरून घेतलं. खऱ्या अर्थाने धम्मातील गुरुस्थानी असलेले मित्र संतोष राऊत, मंगेश दहिवडे, नितीन साळवे यांनी बरीचशी पुस्तकं उपलब्ध करून दिलीत. आई दरवर्षी अत्यंत काटेकोरपणे वर्षावासाचे उपवास करायची. ती आजारपणात असल्यामुळे ते करू शकत नाही याचं तिला खूप वाईट वाटायचं. एकदा गमतीत मी वर्षावासाचे उपवास करतो असं सांगितलं. त्याचा तिला खूप आनंद झाला. तिचा आनंद पाहून मी अत्यंत काटेकोरपणे वर्षावासाचे उपवास केले. या दरम्यान बरीचशी पुस्तकं वाचनात आली. लान्स आर्मस्ट्राँग या प्रसिद्ध लेखकाने कॅन्सरच्या आजारातून बाहेर आल्यानंतर 'इट्स नॉट अबाऊट द बाइक' लिहिलेलं पुस्तक आईला वाचायला दिलं. त्यावेळी मी आईला तिचे सर्व अनुभव, त्यातून ती कशी बाहेर पडली, याविषयीचं तिचं मत. आजाराच्या दरम्यान तिने लिहिलेल्या कथा, कविता यांचा संग्रह करण्याचा आग्रह केला. गेल्या दोन महिन्यांपूर्वी त्या सर्व संग्रहाला एकत्रित करून 'झुंज वेदनांची' ही एक पुस्तिका प्रकाशित केली. त्या पुस्तिकेसाठी प्रसिद्ध साहित्यिक पद्मश्री डॉ. गंगाधर पानतावणे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. आज पानतावणे सर हयात नाहीत पण त्यांनी आईचं कौतुक केलं होतं. तिच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचं स्वागत केलं होतं. आईची जिद्द, तिचे संस्कार या सर्व प्रवासात खूप कामी आले. वाचन, लिखाण, संगीत यामुळे या संकटाला सामोरे जाण्याचं बळ मिळालं. ऑफिसचं कामं, आईचा आजार, पत्नीची रामटेक इथे असलेली पोस्टिंग, लहान मुलगी या सर्व पळापळीत मुलीकडे पाहिल्यानंतर सगळा ताणतणाव विसरून जायचो. तिचा चेहरा डोळ्यासमोर आल्यानंतर आपण या संकटातून हसत हसत बाहेर पडू हा विश्वास वाटायचा आणि त्यात आम्ही यशस्वी झालो.


**मुलाखत - डॉ. विजय कदम**

***



– डॉ. रावसाहेब कसबे

# एका महात्म्या



“कोणताही महापुरुष आकाशातून येत नसतो. तो चमत्कार न
असतो. तो त्याच्या युगाला आपली इच्छा समजावून देण्यात य
खात्री झाली की, तो महात्मा होतो. मोहनदास करमचंद गांधी या
जयंतीनिमित्त नीट समजून घेतला पाहिजे. जागतिकीकरणाची अ


गांधीजींचा खून होऊन आज जवळजवळ सत्तर वर्षे होत आलेली आहेत. कालौघात अनेक महापुरुषांची स्मृती क्षीण आणि अंधुक होत गेलेली जगानं अनुभवली आहे. गांधी मात्र त्याला अपवाद आहेत. ते जिवंत होते त्या काळात त्यांची जितकी चरित्रं लिहिली गेली त्यापेक्षा अधिक त्यांच्या मरणोत्तर लिहिली गेलेली दिसतात. युरोपातील विविध भाषांत त्यांची जवळपास पाचशे चरित्रं आहेत. त्यात इंग्रजी भाषेत सर्वाधिक. विविध भारतीय भाषांत लिहिल्या गेलेल्या त्यांच्या छोट्या-मोठ्या चरित्रांची संख्याही तितकीच असावी. कदाचित त्यापेक्षा जास्त. गेल्या काही वर्षांत तर जागतिक स्तरावर गांधीजींबद्दल इतकं कुतूहल निर्माण झालं आहे की, जगातील अनेक महत्त्वाचे लेखक त्यांच्या जीवनकार्यावर आणि विचारांवर मोठ्या संख्येनं लिहीत आहेत.

कोणताही महापुरुष इतिहासाचे अपत्य असतो. त्याला त्याच्या समाजातच व्यक्तित्व प्राप्त होत असते. परंतु, महापुरुषाचे वैशिष्ट्य हे असते की, तो जसा इतिहासाचे अपत्य असतो तसाच तो त्याच्या काळातील निर्माताही असतो. तो महापुरुष होतो; कारण तो त्याच्या युगाला त्याची इच्छा समजावून देण्यात आणि तिला वास्तवात आणण्यासाठी प्रयत्नरत असतो. ही युगेच्छा मानवजातीच्या कल्याणाची आहे, अशी खात्री झाल्यानंतरच जग त्याला महापुरुष म्हणून मान्यता देते. म्हणूनच महापुरुषांच्या चरित्रकारांना आणि त्याच्या कालखंडाच्या इतिहासकारांना महापुरुष समजून घेताना आणि समजावून सांगताना त्याचा कालखंड, त्यातील समाजव्यवस्था, त्या व्यवस्थेतील आव्हाने, ती पेलण्यासाठी व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवर होत असलेले वैचारिक आणि व्यावहारिक मंथन याचा सम्यक अभ्यास करून महापुरुषाचे स्थान शोधावे लागते. महापुरुषाला घडविण्यासाठी त्याचे सहकारी, विरोधक आणि जनता कोणती भूमिका पार पाडीत असते आणि महापुरुष नवी व्यवस्था घडविण्यासाठी कोणत्या विचारांचा, साधनांचा आणि डावपेचांचा उपयोग कसा करीत असतो, याची चिकित्सक मांडणी



ही पृथ्वी, हवा, पाणी हे सर्व म्हणजे आपल्या बापजाद्यांनी वारसाहक्काने दिलेली मालमत्ता नव्हे, तर ती पु

# ची जडणघडण



सतो तर परिस्थितीचे अपत्य असतो. त्याच्या युगाचा निर्माताही शस्वी होतो. ही युगेच्छा मानवजातीच्या कल्याणाची आहे अशी चं तसंच आहे. मोहनदास ते महात्मा हा प्रवास त्यांच्या १५० व्या रिष्ट्ये सोडवताना त्यांचाही उपयोग होणार आहे''.

करावी लागते.

मोहनदास करमचंद गांधी या तरुणाला विपन्न आणि निराश परिस्थितीत दक्षिण आफ्रिकेतील एका मुस्लिम व्यापारी पेढीवाल्याचे कायदेशीर मदतीसाठी बोलावणे येते. ते तत्काळ स्वीकारून हा बुजरा तरुण वकील वयाच्या चोवीसाव्या वर्षी दक्षिण आफ्रिकेतील डरबान बंदरात नशीब आजमावण्यासाठी पाय ठेवतो. वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षी एक बुद्धिमान, पूर्णतः परिपक्व बनून जागतिक कीर्ती संपादन करतो. गांधीजींच्या वयाच्या चाळीस वर्षापर्यंत त्यांच्या आयुष्याची दखल घ्यावी असे काहीच घडले नव्हते. मग दक्षिण आफ्रिकेत हे कसे घडले?

गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना कसे घडविले यापेक्षा दक्षिण आफ्रिकेनेच गांधीजींना अधिक जास्त घडविले. परंतु, या घडण्याच्या आणि घडविण्याच्या प्रक्रियेचा वस्तुनिष्ठ तपशील कुठेही सापडत नाही.

दक्षिण आफ्रिकेतील सुरुवातीच्या काळात गांधीजी भारतीय श्रीमंत व्यापाऱ्याचे प्रतिनिधी होते आणि त्यांच्या खास हक्कांचे संरक्षणकर्ते होते. त्यात गुजराती, मुसलमान व्यापाऱ्यांची संख्या अधिक होती. आफ्रिकेत भारताच्या विविध भागांतून आलेले मजूर प्रामुख्याने हिंदू होते आणि तमिळींचा भरणा त्यात अधिक होता. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी गांधीजी आफ्रिकेत जाण्यापूर्वीच तेथील भारतीयांनी 'डरबान इंडियन कमिटी' नावाची संस्था स्थापन केली होती. परंतु, गांधीजींनी २२ मे १८९४ रोजी शेठ अब्दुल्ला यांच्या मदतीने 'नाताळ इंडियन कॉंग्रेस' या नव्या संस्थेची स्थापना केली.

गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत केलेल्या कामाचा आणि आंदोलनांचा, त्यात आलेल्या यशापयशाचा तपशील उपलब्ध आहे. गांधीजींचे कार्य पाहून भारावून गेलेले अनेक ख्रिस्ती मिशनरी त्यांच्या संपर्कात आले. गांधींच्या प्रेमात पडले. गांधींच्या जीवनात एकवेळ ख्रिस्ती धर्माबद्दल जबरदस्त आकर्षण तयार झाले होते. स्थिती दोलायमान झाली होती हे त्यांनी स्वतःच नमूद करून ठेवले आहे. दक्षिण आफ्रिकेत गांधीजींना अहिंसक मार्गाने करावयाच्या सत्याग्रहाचा शोध लागल्यानंतर गांधीजी ख्रिस्ती जगात अधिक प्रसिद्ध आणि मान्य झाले. गांधीजींचे पहिले चरित्र लिहिण्याचा मान बाप्टिस्ट पाद्री जोसेफ डोक यांना मिळाला. रेव्ह. डोक यांनी लिहिलेल्या 'एम. के. गांधी : ॲन इंडियन पेट्रियाट इन साऊथ आफ्रिका' या गांधी चरित्राने गांधीजींना जागतिक स्तरावर पोहोचवले. डोक हे अनेक ख्रिस्ती मंडळींप्रमाणेच गांधीजींचे स्नेही होते. रेव्ह. डोक यांना गांधीजी एका ख्रिस्ती प्रेषितासारखे वाटले. त्यांना एक वेगळाच आध्यात्मिक अनुभव आला. गांधीजींचे पहिले चरित्र त्यांनी १९०९ मध्ये लिहिले. गांधीजींना संपूर्ण ख्रिस्ती जग एक ख्रिस्ती संत म्हणून ओळखू लागले.

गांधीजी भारतात आले त्यावेळी भारतीय जनतेसाठी ते फारच नवखे होते. भारताचीही त्यांना पुरती ओळख नव्हती. पुढे ना. गोखले यांच्या आग्रहामुळे त्यांनी ती करून घेतली. गांधीजींना भारतीय राजकीय व्यासपीठावर स्थान मिळणेही

ढील पिढ्यांसाठीची जोखीम होय. ती किमान जशीच्या तशी त्यांच्या हाती सोपवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.



अवघड होते. कारण ते भारतात येण्यापूर्वीपासून वीस वर्षे इंडियन नॅशनल काँग्रेस किंवा राष्ट्रसभा राजकीय क्षेत्रात कार्यरत होती. तिच्या नेतृत्वात अनेक दिग्गजांचा समावेश होता. त्यांना दक्षिण आफ्रिकेप्रमाणे स्वतःची संघटनाही उभारणे शक्य नव्हते. यातून मार्ग काढण्यासाठी आणि स्वतःची खास ओळख निर्माण करण्यासाठी गांधीजींनी जे दोन महत्त्वाचे प्रयोग केले, त्यातून त्यांच्या विलक्षण बुद्धिमत्तेची आणि सामान्य जनतेप्रति असलेल्या बांधिलकीची साक्ष मिळते. भारतीय राष्ट्रसभेला ज्या कोट्यवधी ग्रामीण शेतकरी आणि औद्योगिकीकरणाने शहरात उदयाला आलेल्या मजूरवर्गापर्यंत पोहोचता आले नव्हते. तिथे गांधीजींनी जाण्याचे ठरविले, तेही राष्ट्रसभेच्या परिघाबाहेर राहून. यासाठी त्यांनी पहिली गोष्ट केली, ती राष्ट्रसभेत प्रत्येक प्रांताचा एक मोठा नेता होता; परंतु गुजरात त्यातून मोकळा होता. म्हणून त्यांनी स्थायिक होण्यासाठी गुजरातची निवड केली. आपल्या स्वतंत्र विचारांच्या प्रचारार्थ त्यांनी 'यंग इंडिया' आणि 'नवजीवन' ही वृत्तपत्रे सुरू केली.

अहमदाबादेतील गिरणी कामगारांचे संघटन करून, संप घडवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अनसूया साराभाई यांनी कामगारवर्गात काम सुरू केले होते. त्या प्रसिद्ध उद्योगपती साराभाईंच्या भगिनी होत्या. गांधीजींनी त्यांना मदतीचा हात दिला आणि कामगारांची बाजू उचलून धरली. गांधीजी बघता बघता भारतीय कामगारवर्गाला आपले नेते वाटू लागले. गांधीजींना खरे आणि जाहीरपणे महात्मा केले ते चंपारण्यातील एका मध्यम शेतकऱ्याने. त्याचे नाव राजकुमार शुक्ल. ते गांधीजींना चंपारण्यात नेण्यासाठी डिसेंबर १९१६ च्या लखनौ काँग्रेसला हजर राहिले. त्यांनी गांधीजींनी चंपारण्यात यावे अशी अनेक वेळा विनवणी केली; परंतु चंपारण्य भारतात कुठे आहे हेही गांधीजींना माहिती नव्हते. शेवटी गांधीजी हा-ना करता चंपारण्यात गेले. मध्यरात्रीच्या सुमारास ते रेल्वे स्टेशनवर उतरले तेव्हा तिथे सुशिक्षित तरुणांची गांधीजींना पाहण्यासाठी तुफान गर्दी उसळली होती. गांधीजींचा सार्वजनिक ठिकाणी 'महात्मा' म्हणून उल्लेख करणारे राजकुमार शुक्ल हे अडाणी शेतकरी होते. गांधीजींचे चंपारण्यातील या काळातील कार्य सर्वज्ञात आहे. गांधीजींनी चंपारण्यात दोन महत्त्वाच्या गोष्टी केल्या. पैकी एका शेतकऱ्याच्या मनातून कायद्याची आणि ब्रिटिश सत्तेची भीती कायमची दूर केली आणि दुसरी शेतजमिनीसंबंधीच्या कायदेशीर प्रश्नाला राजकीय रूप देऊन अखिल भारतीय पातळीवर नेले. तिथेच त्यांना राजेंद्र प्रसाद यांच्यासारखा विश्वासू सहकारी लाभला. चंपारण्यातील असंख्य शेतकऱ्यांच्या पाठिंब्यामुळे आणि त्यांनी भरभरून दिलेल्या प्रेमामुळे गांधीजी भारतीय राजकारणात खेचले गेले.

गांधीजींच्या समोरची आव्हाने समाजवास्तवातील होती. ती पेलण्यासाठी पाश्चिमात्य प्रबोधनाच्या चळवळीचा सर्वाधिक उपयोग करून घेणे शक्य होते. परंतु, गांधीजींनी तर पाश्चात्य संस्कृती आणि तंत्रज्ञानाशी उभा दावा मांडलेला होता. भारतातून ब्रिटिश साम्राज्य नष्ट करण्यापेक्षा भारतीयांवर झालेले पाश्चात्य संस्कृतीचे संस्कार नष्ट करणे त्यांना अधिक महत्त्वाचे वाटत होते. अर्थात, ते नष्ट करणे त्यांच्याही आवाक्यात नव्हते. पाश्चिमात्य संस्कृतीला बाजूला सारून, नवी भारतीय संस्कृती निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या धर्मचिकित्सेचे त्यांच्यात धाडस नव्हते. समाजशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र नावाच्या काही ज्ञानशाखा आहेत आणि जागतिक स्तरावर त्या विकास पावलेल्या आहेत याचा गंधही गांधीजींना नव्हता. त्यामुळे त्यांना भारतीय मुस्लिम मन जसे समजू शकले नाही तसेच भारतीय जातीसंस्थाही नीट समजली नाही. अस्पृश्यता हा श्रेणीबद्ध वर्ण आणि जातिव्यवस्थेचा परिणाम आहे. ती नष्ट करणे म्हणजे जातीसंस्थेलाच सुरूंग लावणे हे त्यांनी समाजशास्त्रीयदृष्ट्या कधी समजूनच घेतले नाही. गांधीजींच्या या अंगभूत मर्यादांमुळे त्यांनी भूतकाळात रमणे पसंत केले. ते भूतकाळातील ऋषी-मुनींची गूढ भाषा बोलू लागले. मोक्ष, ईश्वराची समोरासमोर भेट, अध्यात्म, ईश्वरापुढील समर्पण

मूल्यांमधून विचार जन्माला येतात. विचारांमधून शब्द तयार होतात. त्यातून तुमच्या कृती घडतात. कृतींमधून माणसांची व्यक्तिमत्त्व घडतात आणि मूल्ये तयार होतात. अखेर मूल्येच आपले प्राक्तन लिहितात.



इत्यादी शब्दांचा वारंवार उपयोग करू लागले. भारतात आपली प्रतिमा एका लौकिक महापुरुषाची न बनता ती एका आध्यात्मिक, गूढ आणि अलौकिक महात्म्याची बनावी यासाठी ते प्रयत्नशील राहिले.

गांधीजी अनेकदा चेष्टावजा असे म्हणत असत की, रोमाँ रोलाँ यांनी केलेल्या चुका सुधारण्यासाठी आपण 'आत्मकथा' लिहिली. गांधीजींच्या आत्मकथेच्या लेखनामागील ही पार्श्वभूमी एकदा समजून घेतली की, अनेक गोष्टी समजू शकतात. गांधी एक 'आख्यायिका' आणि 'गूढ' याचा शोध घेता येतो.

इतिहास आणि महापुरुषांच्या चरित्रासंबंधी काही गोष्टी नीट समजून घेतल्या पाहिजेत. महापुरुष हा काही एखाद्या जादूच्या पेटीतून किंवा अज्ञात आभाळातून आश्चर्यकारकरीत्या जमिनीवर टपकत नसतो आणि इतिहासाच्या सातत्यात हस्तक्षेप करीत नसतो. प्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ हेगेल यांनी म्हटल्याप्रमाणे, 'कोणत्याही युगातील महापुरुष हा त्याच्या युगाच्या इच्छेला शब्दबद्ध करीत असतो आणि त्या युगाला त्याची इच्छा सांगत असतो. त्या युगेच्छेला वास्तवात आणण्यासाठी कार्यरत असतो'. वास्तविक पाहता महापुरुष हासुद्धा एक व्यक्तीच असतो.


गांधीजी भारतीय राष्ट्रसभेचे सर्वोच्च नेते बनले त्यावेळी तिच्यातील सर्व दिग्गजांचे निधन झालेले होते. बॅ. महंमद अली जीना आणि मदन मोहन मालवियांसारखे काही अपवाद होते. त्यांना आपापल्या जाती-धर्मांचा कमी-अधिक प्रमाणात पाठिंबा होता. पैकी जीना हे घटनातज्ज्ञ आणि कायदेपंडित होते, तर मालविय हे शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील एक अग्रणी होते. तरीही हे दोघेही जाती-धर्माच्या प्रभावामुळे गांधीजींचे स्पर्धक बनणे शक्य नव्हते. जीना गांधीजींपेक्षा वैचारिक आणि वास्तविक जीवनात अधिक बुद्धिवादी आणि धर्मनिरपेक्ष होते. गांधीजींनी खिलाफतीच्या चळवळीमार्फत भारतीय राजकारणाला धार्मिक आणि आध्यात्मिक पातळीवर नेण्याचा जो प्रयत्न सुरू केला होता तो जीनांना अजिबात मान्य नव्हता. त्यामुळे मुसलमानांत धार्मिक पुनरुज्जीवनाचे भूत संचारेल अशी त्यांची भीती होती.

मालविय, मुंजे, श्यामाप्रसाद आणि पुढे बॅ. सावरकरांनी आणि गोळवलकरांनी हिंदूंना संघटित करण्यासाठी आपापल्या संस्था आणि संघटना प्रभावीपणे कामाला लावूनही ९५ टक्के हिंदू जनता गांधींमागे का उभी राहिली याचाही शोध ऐतिहासिक घटना, तथ्ये आणि नवनव्या समाजशक्तींच्या सहाय्याने घेतला पाहिजे. इतिहासातील या नव्या पैलूंचे जसजसे अधिक संशोधन होईल तसतशी गांधीजींची अद्यापही अज्ञात असलेली रूपे उघड होतील आणि गांधीजी सतत नित्य, नूतन रूपात जगासमोर उभे राहून मार्गदर्शक बनतील. आजच्या जटिल आणि हिंस्र जागतिक वातावरणात जगाला त्यांची फार गरज आहे.

आपल्या आयुष्याची पहिली पन्नास वर्षे गांधीजी भारतातील ब्रिटिश राज्याला ईश्वरी वरदान मानणारे होते. त्या अर्थाने ते स्वतःला गोखल्यांचे शिष्य म्हणवून घेत. ते स्वाभाविकच होते. परंतु ते चंपारण्यात गेल्यापासून ब्रिटिश सत्तेबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन बदलला. १९२० मध्ये लोकमान्यांचे निधन झाल्यानंतर ते भारतीय राष्ट्रसभेचे नेते झाले आणि इंग्रजी सत्तेला सैतानाचा शाप म्हणू लागले. गांधीजींनी १९०९ मध्ये लिहिलेले एकमेव वैचारिक लिखाण 'हिंद स्वराज्य' हे आहे. त्यात त्यांनी राष्ट्रसभेच्या त्यावेळच्या सर्वच दिग्गज नेत्यांची भरपूर स्तुती केली आहे. त्यात लोकमान्यांचा उल्लेख 'टिळक महाराज' असा केला आहे.

गांधीजींच्या किसान आणि कामगार नेता या प्रतिमेने काँग्रेस झाकाळून गेली होती. त्यांना काँग्रेसची गरज नव्हती. त्यापेक्षा काँग्रेसलाच त्यांची अधिक गरज असल्याने काँग्रेसच्या सर्व गटांना त्यांच्या नेतृत्वाला मान्यता द्यावी लागली. काँग्रेसमध्ये त्यांच्या विचारांचे कार्यकर्ते फारच कमी होते. १९३४ मध्ये त्यांनी काँग्रेसच्या सदस्यत्वाचा त्याग केला; परंतु ते शेवटपर्यंत मार्गदर्शक राहिले.





विश्वास ठेवणे हा एक गुण आहे; अविश्वास दुर्बलतेची जननी आहे.

गांधीजी स्वतःला शेवटपर्यंत सनातनी हिंदू म्हणवून घेत होते तरी कालौघात बरेच उदारमतवादी बनलेले दिसतात. वयाच्या ऐंशीच्या वर्षात पदार्पण करणाऱ्या, शरीराने पूर्णपणे दुर्बल झालेल्या, राजकारणातील सततच्या पराभवाने खिन्न आणि उदास झालेल्या, स्वातंत्र्यानंतर स्वप्नभंग होऊन एकाकी पडलेल्या आणि एका मृत्यूशय्येवर पडल्यासारख्या महात्म्याचा खून करून हिंदू राष्ट्रवाद्यांना काय मिळणार होते? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर अद्याप इतिहासाने दिलेले नाही. त्यांच्या खुन्यांनी दिलेली कारणे कितीही भावनात्मक आणि आकर्षक असली तरी ती पटणारी नाहीत. हा कट केवळ गांधी खुनापुरता मर्यादित दिसत नाही. तो राज्यव्यवस्थाच ताब्यात घेण्याच्या एका व्यापक कटाचा एक अंश असावा अशी शंका घेण्याला बरीच जागा आहे. त्यांच्या खुनाला फाळणीची पार्श्वभूमी होती. वास्तविक पाहता गांधीजींचा फाळणीशी व्यक्तिशः कोणताही संबंध नव्हता. ती जबाबदारी नेहरू आणि पटेलांवर त्यांनी सोपविली होती. फाळणीचा पाया आणि मुसलमानांचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व लखनौ कराराने १९१६ सालातच मान्य केले होते. त्याच्यावर लोकमान्यांची सही होती; परंतु लोकमान्य टिळक तर सावरकरांना गुरुस्थानी होते. मुसलमान आणि सावरकर एकाच आवाजात द्विराष्ट्रवादाचा पुरस्कार करीत होते. त्यामुळे हिंदू-मुस्लिम ऐक्य निकालात निघाले होते.

गांधीजींना भारतात आल्यावर हिंदू धर्म महान वाटू लागला. त्यांच्यावरील ख्रिस्ती धर्माचा पगडा जसजसा कमी होत गेला तसतसे ते हिंदू धर्माचे अधिक गोडवे गाऊ लागले. एकदा त्यांनी स्वतः त्यांना जे धर्म ज्ञात आहेत त्यात सर्वांत हिंदू धर्म सर्वाधिक सहिष्णू आहे, असे जाहीरही करून टाकले होते. परंतु हिंदू राष्ट्रवादी त्याला अपवाद निघाले. गांधीजींना भगवतगीता सर्वाधिक आवडली होती आणि पतंजली त्यांना पूज्य होते. परंतु, विरोधाभास असा की नथुराम आणि आपटे तुरुंगात गीतेचेच वाचन आणि पतंजलीच्या योगाची चर्चा करण्यात दिवस काढीत होते.


गांधीजींच्या खुनानंतर त्यांचे खरे तीनच वारसदार शिल्लक राहिले होते. पैकी एक विनोबा, दुसरे जयप्रकाश नारायण आणि तिसरे डॉ. राम मनोहर लोहिया. गांधीजी त्यांच्या संपूर्ण कार्यकाळात कम्युनिस्टासंबंधी नेहमीच जागृत राहिले. कम्युनिस्ट विचारवंत रजनी दत्तांपासून ते इ. एम. एस. नंब्रुद्रिपाद यांच्या लिखाणाकडे पाहिले तर त्या त्या दृष्टीने गांधी हे जमीनदार-भांडवलदार आणि सावकार वर्गाचे प्रतिनिधी होते. गांधीजींच्या अहिंसेच्या तत्त्वाच्या अतिरेकामुळे त्यांनी या वर्गाच्या हितसंबंधांना नेहमीच सुरक्षित ठेवले. गांधीजींची विश्वस्ताची कल्पना या वर्गाच्या दृष्टीने अगदीच निरुपद्रवी होती. त्यामुळे गांधीजींच्या चळवळीने भारतीय समाजाची आर्थिक घडी आहे तशीच ठेवली होती. आर्थिक विषमता टोकाला गेली होती. त्यांच्याकडे आधुनिक युगाला साजेसा असा कोणताही कार्यक्रम नव्हता. कम्युनिस्टांच्या टीकेत बरेच तथ्य होते.

**अर्न्स्ट शूमाकर यांनी १९७० मध्ये 'स्मॉल इज ब्यूटिफूल' हा ग्रंथ लिहिल्यानंतर 'सम्यक तंत्रविज्ञान' या विचाराकडे जगाचे लक्ष वेधले गेले. अर्थात, हा विचार गांधीजींच्या चिंतनात बीजरूपात होताच. त्यामुळे गांधीजींच्या पर्यावरणवादी विचारावर जगात पुन्हा नव्यानं मंथन सुरू झालं. १९८७ मध्ये बॅट लँड कमिशनचा 'मानवजातीचे भवितव्य' हा सुप्रसिद्ध अहवाल तयार केला गेला. त्यात गांधीजींकडून प्रेरणा घेतल्याचा स्पष्ट उल्लेख आढळतो. शूमाकर यांच्यावर बुद्धाचा प्रभाव होता.**




जे वेळ वाचवितात ते पैसा वाचवितात आणि वाचविलेले पैसे कधीही कमाविलेल्या पैशांप्रमाणेच महत्त्वपूर्ण असतात.






तथागत गौतम बुद्ध



महात्मा गांधी



कार्ल मार्क्स

आज राष्ट्रीय असे काहीच शिल्लक राहिले नसल्याने नेते आणि चळवळींचा विचारही राष्ट्रीय नव्हे तर जागतिक पातळीवरूनच केला गेला पाहिजे. संपूर्ण जगातील मानवजातीला कवेत घेणाऱ्या नेत्याच्या आणि प्रागतिक चळवळीच्या प्रतीक्षेत जग आहे. परंतु आता एखादा अवतार, मसिहा किंवा दूत पृथ्वीतलावर येण्याची शक्यता नाही. मनुष्यजातीला तिच्यापुढील प्रश्न तिला स्वतःलाच सोडवावे लागतील. पंतप्रधान मोदी परदेशात गेल्यावर बुद्ध आणि गांधीजींच्या नावाचा सतत जयजयकार करीत असतात. कधी कधी त्यांना बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचेही उमाळे येतात. भारतावर राज्य करायचे असेल तर प्रत्येक राजकीय पक्षाला आणि नेत्याला या नावांचा जप करावाच लागतो; कारण ते त्यांच्यासाठी संरक्षक कवच असते. परंतु त्यांना सत्ताधाऱ्यांच्या संरक्षक कवचाच्या बाहेर काढून सर्वसामान्यांचे संरक्षक बनेल अशी त्यांची नवी प्रतिमा उभी करावी लागेल.

जागतिक पातळीवर आमूलाग्र परिवर्तन करावयाचे असेल तर त्यासाठी तीन महापुरुष इतिहासाने संपूर्ण मानवजातीला दिले आहेत. बुद्ध, कार्ल मार्क्स आणि महात्मा गांधी. बुद्धाला आपण अवतारात समावेश करून त्यांच्या विचारातील माणूस आणि समाजपरिवर्तनाची चेतनाच नष्ट केली आहे. बौद्ध जगाने तर जास्तच. कार्ल मार्क्स यांच्या मूळ क्रांतिकारी तत्त्वज्ञानाचा उपयोग जगभरच्या कम्युनिस्टांनी केवळ राज्यसत्तेच्या प्राप्तीसाठीच केला. त्यांचे माणसासंबंधीचे, परिवर्तनाचे, त्याच्या अंतर्बाह्य स्वरूपाचे, त्यांच्या घडण्याचे आणि तो नवे जग कसे निर्माण करू शकेल, त्यांच्या समग्र मानवाचे चिंतन त्यांना कधीच समजले नाही आणि त्यांनी समजून घेण्याचा प्रयत्नही केलेला नाही. गांधीजींचा, त्यांच्या अहिंसक सत्याग्रहाचा उपयोग गरिबी, शोषण आणि विषमता नष्ट करण्यासाठी ना गांधीवाद्यांनी केला ना काँग्रेसने. या तीनही महापुरुषांच्या भविष्यात दडलेल्या प्रतिमांचा आत्ताच शोध घेऊन या तिन्हींच्या संयोगातून उभी राहू शकेल अशी एकच प्रतिमा आजच्या ज्वालामुखीच्या तोंडावर असलेल्या जगाला वाचवू शकेल. या तीनही महापुरुषांत एक समान धागा आहे. कार्ल मार्क्स यांनी 'नेचर इज इन ऑर्ग्यानिक बॉडी ऑफ मॅन' असे म्हटलेले होते. माणसाच्या सेंद्रिय शरीराजवळ सर्व मानवी गरजा पूर्ण करण्याची शक्ती आणि साठा आहे. त्यासाठी मानवजातीच्या कल्याणासाठी आवश्यक परंतु भांडवलशाही आणि त्याने जन्माला घातलेली अजस्र यंत्रे यांनी त्याला निर्जीव बनविण्याचे प्रयत्न चालविलेले आहेत. तो निर्जीव झाला तर मानवजातीला निर्जीव बनण्यास फार वेळ लागणार नाही. या तीनही महापुरुषांना त्यांच्या विकृत केलेल्या प्रतिमांतून आणि त्यांच्या विचारांची पोथी बनविण्याच्या प्रयत्नातून बाहेर काढले पाहिजे तरच उद्याचा मार्गदर्शक जगाला लाभेल. माणसाला अधिकाधिक 'माणूस' बनविण्यासाठी, त्याच्यातील सर्व सुप्त शक्तींच्या प्रकटनासाठी, त्याचे जगणे सार्थ आणि सुंदर करण्याची संधी त्याला प्राप्त होण्यासाठी आज अशा मार्गदर्शकाची, जनतेच्या चळवळींची फार गरज आहे.

***




जर चूक करण्याचे स्वातंत्र्य दिले गेले नाही तर त्या स्वातंत्र्याला काहीही अर्थ उरत नाही.



– डॉ. हमीद दाभोलकर

# युवकांसाठी मानसमैत्री

*युवकांमध्ये मानसिक आजार जगभर झपाट्यानं पसरतोय; पण त्यावर उपचार करणारी व्यवस्था खूपच तोकडी आहे. मनाचे चित्र काढा म्हटलं की, अनेक जण हृदयाचं चित्र काढतात एवढं मनाविषयी अज्ञान आहे. मानसिक आजारांमुळे दरवर्षी आपल्याकडे लाखभर आत्महत्या होतात. त्यात युवकांची संख्या जास्त. कारणेही किरकोळ. प्रेम, मार्क, करिअर, परीक्षा इत्यादी. अशा परिस्थितीत उगवती पिढी सावरण्यासाठी मानसमैत्रीचा पूल बांधण्याची खूपच आवश्यकता आहे आणि तो शक्य आहे.*



**तरुण मित्र-मैत्रिणींनो,**

आपल्या समाजात मानसिक आरोग्याचे प्रश्न कायमच दुर्लक्षित राहिलेले आहेत. जातीच्या उतरंडीची तुलना करायची झाली तर मधुमेह, उच्चरक्तदाब हे तथाकथित उच्चवर्णीय आजार आणि क्षयरोग, मानसिक आजार हे तथाकथित नीचवर्णीय आणि कायमच गावकुसाबाहेर राहिलेले आजार अशी करता येईल. याची अनेक कारणे आहेत. त्यामध्ये मनाच्या प्रश्नांबद्दल घोर अज्ञान, मानसिक आजार आणि अंधश्रद्धा यांची अभद्र युती, आजारांशी जोडली गेलेली कलंकाची भावना, नानाविध कारणांनी वाढणारे ताणतणाव आणि मानसिक अस्वास्थ्य व अत्यंत तोकड्या प्रमाणात असणारी मानसिक आरोग्याच्या क्षेत्रातील तज्ज्ञांची संख्या अशा अनेक गोष्टी येतात. प्रत्येक गोष्ट ही स्वरूप लेखाचा विषय होऊ शकतो; पण थोडक्यात तरी आपण ते समजून घेतलेच पाहिजे.

मानवी मनाविषयीचे आपल्या समाजातील अज्ञान पराकोटीचं आहे. माणसाचं शरीर कुठं असतं असा प्रश्न विचारणे किती हास्यास्पद वाटते ना? पण माणसाचे मन कुठे असते या प्रश्नाचे उत्तर अनेक डॉक्टर, शिक्षक, वकील, पत्रकार यांना देखील नसते. मग सामान्य माणसाची काय बात! मनाचे चित्र काढा, असे म्हटले तर आपल्याकडे अनेकदा हृदयाचे चित्र काढले जाते. मेंदू ही एक रचना आहे आणि मन हे त्या रचनेचे कार्य आहे. इतके मूलभूत वास्तव आपल्यातील अनेकांना माहीत नसते. त्यामुळे मन हे आजारी पडू

शकते, त्याचे उपचार होऊ शकतात हे तर फारच पुढचे झाले.

आजारांशी जोडली गेलेली कलंकाची भावनादेखील उपचारांमधील एक मोठा अडथळा ठरते. आपले शरीर आजारी पडले तर आपण पटकन उपचार घेतो; पण मन आजारी पडले तर ते अंगावर काढतो. मनोविकारतज्ज्ञांकडे जाणे म्हणजे ठार वेडे होणे असा एक गैरसमज आपल्या समाजात खोलवर रुजलेला आहे. लोकांना आपण मानसिक उपचार घेत असल्याचे कळले तर लोक काय म्हणतील, या विचाराने देखील अनेकजण उपचार घ्यायचे टाळतात. मानसिक आजाराशी जोडल्या गेलेल्या या कलंकाच्या भावनेमुळे योग्य वेळी उपचार घेतला जात नाही. त्यामुळे आजार बळावतो.

एकूण मानसिक आजाराच्या व्याप्तीबद्दल देखील पुरेशी माहिती नसते. खुद्द जागतिक आरोग्य संघटनेने असे नोंदवले आहे की, जगभरात प्रत्येक पाच व्यक्तींच्या मागं एका व्यक्तीला त्याच्या/तिच्या आयुष्यात कधीना कधी कोणत्या तरी मानसिक आजाराला सामोरे जावे लागते. केवळ भारतात एक लाखापेक्षा अधिक लोक स्वतःच्या हाताने आयुष्य संपवून घेतात. हे सर्व झाले केवळ मानसिक आजारांच्या विषयी. मानसिक ताणतणाव, म्हणजे आपल्या बोलीभाषेत ‘टेन्शन’ हे न येणारी व्यक्ती सध्याच्या धकाधकीच्या जीवनात सापडणे दुर्मिळ झाले आहे. वर नोंद केलेल्या सर्व गोष्टी कमी म्हणून की काय भारतामध्ये सगळे मिळून चार हजार देखील मनोविकारतज्ज्ञ नाहीत. जागतिक मानकांनुसार एक लाख लोकसंख्येला एक मनोविकारतज्ज्ञ असणे आवश्यक आहे. म्हणजे भारतात जवळजवळ बारा हजार मनोविकारतज्ज्ञांची गरज आहे. समुपदेशक, मनोसामाजिक कार्यकर्ते आणि मानसिक क्षेत्रातील तज्ज्ञ, नर्स यांची संख्या तर याहीपेक्षा वाईट आहे. ही स्थिती केवळ भारतामध्ये आहे असे नाही. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानसिक आरोग्य विभागाचे प्रमुख डॉ. शेखर सक्सेना म्हणतात की, मानसिक आरोग्याचा विचार करताना जगातील प्रत्येक देश हा विकसनशील आहे.



तरुण मुला-मुलींच्या संदर्भात बोलायचे झाले तर या वयातील वाढत्या आत्महत्यांविषयी बोलायलाच हवे. कोणतीही आत्महत्या मनाला वेदना देणारीच असते; पण सर्वांत जास्त अस्वस्थ करून जाते ते तरुण मुला-मुलींचे आत्महत्या करणे. ज्या वयात आयुष्य रसरसून अनुभवायचे त्या वयात जर आत्महत्या करावे वाटत असेल तर ती खूपच गंभीर गोष्ट आहे. परीक्षेचा हंगाम सुरू झाला की, वृत्तपत्रात जवळजवळ तरुण मुला-मुलींच्या आत्महत्या झाल्याच्या बातम्या येऊ लागतात. मागच्या आठवड्यात महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी दहापेक्षा अधिक अशा घटना घडल्या. हे आत्महत्यांचे सत्र आता सहावी, सातवीच्या शालेय मुलांपर्यंतदेखील पोहोचलं आहे. लान्सेट या जगप्रसिद्ध नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधाचा दाखला द्यायचा तर भारतात दरवर्षी होणाऱ्या एक लाख आत्महत्यांच्या मधील ५० हजारपेक्षा अधिक आत्महत्या १५ ते ३५ वयोगटातील असतात. कुठल्याही तरुण मुलाची आत्महत्या संपूर्ण कुटुंबाच्या उर्वरित आयुष्यावर एक खूप मोठा नकारात्मक परिणाम करते. अनेकदा या आत्महत्यांच्या मागची कारणे दैनंदिन जीवनातील असतात. त्याचा परिणाम म्हणून या वयोगटात मुले असलेल्या पालकांच्या मनावर, ‘आपले मूल तर असे काही करणार नाही ना?’ या विचाराचा मोठा ताण राहतो. युवांच्या आत्महत्यांचा समाजमनावर होणारा परिणाम पाहता त्या थांबवण्यासाठी तातडीचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. नागरी समाज म्हणून आपण या आत्महत्यांच्या मागची कारणमीमांसा नीट समजून घेतली आणि सुनियोजित प्रयत्न केले तर अनेक आत्महत्या आपण रोखू शकतो.

एखाद्या व्यक्तीचे

आत्महत्या करण्यामागचे कारण कोणतेही असले तरी आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या लोकांपैकी ९० टक्क्यांहून अधिक लोक तशी कृती करण्याआधीच्या आठवड्यात त्यांच्या जवळच्या व्यक्तीशी थेट अथवा अप्रत्यक्षपणे आपल्या मनातील भावना व्यक्त करीत असतात. कोणतीही आत्महत्या थांबवण्यासाठी याप्रसंगी संबंधित व्यक्तीला मदत मिळणे अत्यंत आवश्यक असते. जवळचे नातेवाईक, मित्रमैत्रिणी, शेजारी अशी कोणतीही व्यक्ती या स्वरूपाची मदत करू शकते. ज्या पद्धतीने हृदयविकाराचा झटका आल्यावर पहिल्या तासात मदत मिळाली तर बरे होण्याची शक्यता अनेक पटीने वाढते, आत्महत्येचे विचार जेव्हा एखादी व्यक्ती पहिल्यांदा व्यक्त करते तेव्हा जर योग्य मदत मिळाली तर त्यामधून मोठ्या प्रमाणात आत्महत्या टाळता येऊ शकतात. जसे शारीरिक प्रथमोपचाराचे प्रशिक्षण घेता येते तसेच आत्महत्येचे विचार मनात येत असलेल्या व्यक्तीला भावनिक प्रथमोपचार कसे द्यावेत याचेदेखील प्रशिक्षण कोणीही घेऊ शकते. महाराष्ट्र 'अंनिस'ने शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी असे काही शेतकरी मानसमित्र प्रशिक्षित केले आहेत. युवा वर्गासाठी आत्महत्येचे विचार मनात येणारे युवा आणि संतुलित जीवन यांच्या मध्ये भावनिक प्रथमोपचाराचे पूल बांधणारे मानस मित्र/मैत्रिणी तयार करणे अजिबात अवघड नाही. एक दिवसाच्या प्रशिक्षणात आपण ही कल्पना आत्मसात करू शकतो. या प्रशिक्षणामुळे आत्महत्येचे विचार मनात येत असलेली व्यक्ती कशी ओळखावी? आत्महत्येच्या विचाराविषयीचे समाजातील गैरसमज एखाद्या व्यक्तीने आपल्याजवळ व्यक्त केले तर त्याला/तिला भावनिक प्रथमोपचार कसे द्यावेत? अशा व्यक्तीला मनोविकारतज्ज्ञाकडे अथवा समुपदेशकाकडे कधी न्यावे, अशा गोष्टी आपण शिकू शकतो. खास करून करिअर व प्रेम ाच्या नातेसंबंधात आलेले अपयश पचवायला आजच्या तरुण पिढीला अवघड जाते आहे. प्रेम व आकर्षण या संकल्पनांमधील गोंधळ, एकदा प्रेमात अपयश आले म्हणजे आयुष्य संपले अशी मनोधारणा तरुणाईत मोठ्या प्रमाणात दिसून येते. बदलत्या कुटुंबव्यवस्थेचादेखील एक महत्त्वाचा संदर्भ या आत्महत्यांना आहे. आयुष्यात टोकाच्या ताणाच्या प्रसंगी जवळचे नातेसंबंध आपल्याला भावनिक आधार देण्याचे काम करीत असतात. बदलत्या कुटुंबव्यवस्थेमध्ये अशा आधाराच्या जागा झपाट्याने कमी होताना दिसतात. त्याचा सगळ्यात मोठा फटका मुलांना व तरुणांना बसताना दिसतो आहे. आयुष्याच्या प्रचंड वाढलेल्या वेगामुळे शांतचित्ताने समोरच्या प्रसंगाचा विचार करण्याचे कौशल्यदेखील कमी होते आहे की काय, अशी शंका येते. आपल्या बहुतांश लोकांच्या आयुष्यामध्ये असा प्रसंग कधीना कधी तरी येतो की, दैनंदिन जीवनाचे त्रास सहन करण्यापेक्षा नसलेले बरे असा विचार मनामध्ये चमकून जातो. अशा परिस्थितीत त्या विचारावर उतावळेपणाने कृती करण्याऐवजी आपण आयुष्यातील सकारात्मकतांचा विचार करून स्वत:ला सावरतो. आपल्या व्यक्तिमत्त्वाची परीक्षा पाहणाऱ्या या क्षणांना सामोरे जाण्याचे कौशल्य तरुण पिढीमध्ये कमी पडल्यामुळे तर अशा घटना घडत नाहीत ना? अशी शंका मनामध्ये येत राहते. आपल्याला जर मानस मित्र/मैत्रीण व्हायचे असेल तर आपल्याला हे समजून घ्यावे लागेल की, आत्म हत्येचे विचार व्यक्त करणे दुबळेपणाचे लक्षण नाही किंवा ती व्यक्ती नाटकदेखील करीत नाही. त्या व्यक्तीचे मन आजारी आहे आणि हे विचार व्यक्त करणे म्हणजे त्या व्यक्तीने मदतीसाठी मारलेली हाक आहे. काही वेळा डिप्रेशनसारख्या आजाराचे देखील हे लक्षण असू शकते. योग्य समुपदेशन आणि काही वेळा औषधे यामधून हे विचार दुरुस्त होऊ शकतात.

युवा वर्गात करिअर आणि प्रेमसंबंधात आलेले अपयश ही आत्महत्येमागची महत्त्वाची अधिक कारणे असतात. मानसमित्र म्हणून आपण जर त्यांचे दुःख समजून घेऊ शकलो आणि आयुष्यात अपयशही येत असते. त्यामधून आपले खूप शिक्षण होते हा साधासोपा विचार त्यांच्यापर्यंत पोहोचवू शकलो तरी अनेकांना योग्य मदत पोहोचवू शकतो. खरे तर अनेक तरुण मुले-मुलीच पालक आणि वडीलधाऱ्या माणसांपेक्षा हे काम अधिक चांगले करू शकतात. आपल्या समवयस्कांशी मन मोकळे करणे अधिक सोपेदेखील असते. आत्महत्येविरोधी जनजागृती करणे यासाठी हे युवा मानस मित्र/मैत्रिणी सोशल मीडियावर मोहीम चालवू शकतात. मोठ्या प्रमाणत तरुण सोशल मीडियावर सक्रिय असल्याने त्याचा फायदा याविषयीचे गैरसमज दूर होण्यासाठी आणि युवा वर्गाला योग्य वेळी मदत मिळण्यासाठी होऊ शकतो. शेतकरी आत्महत्या बाबतीत शासनाने केलेला खेळखंडोबा पाहता युवा आत्महत्या रोखण्यासाठी शासन फार काही करेल अशी अपेक्षा करणे चुकीचे होईल. नागरी समाज, सुजाण पालक आणि विवेकी युवा यांनी एकत्र येऊन मानसमैत्रीचे पूल मनामनातून बांधायचे ठरवले तरच ही ऐन 'वसंतातील पानगळ' थांबू शकेल असे वाटते.


या परीस्थितीत 'सर्वांसाठी भावनिक प्रथमोपचार', ही जागतिक आरोग्य संघटनेने सुरू केलेली मोहीम खूप महत्त्वाची ठरू शकते. त्याची कारणे आपण समजून घेऊया. पहिले कारण म्हणजे भावनिक प्रथमोपचार हे टेन्शनच्या पहिल्या टप्प्यावर दिले जातात. अनेक वेळा ते छोट्या-मोठ्या टेन्शनचे मानसिक आजारांमध्ये रूपांतर होणे टाळू शकतात. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भावनिक प्रथमोपचार देण्यासाठी काही खूप मोठ्या प्रशिक्षित व्यक्तीची गरज नाही. महाराष्ट्र अंनिसतर्फे राबवण्यात येणाऱ्या मानसमैत्री या मोहिमेत ज्याची इच्छा असेल अशा कोणत्याही नागरिकाला भावनिक प्रथमोपचाराचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामधून अनेक व्यक्ती आणि कुटुंब यांच्यापर्यंत मानसिक आरोग्याच्या सुविधा पोहोचवता येतात असा अनुभव आहे. केवळ तेवढेच नाही तर शास्त्रीय, भावनिक प्रथमोपचार मिळाले तर अनेक रुग्ण आणि कुटुंबीय हे अंधश्रद्धांच्या कचाट्यातून सुटू शकतात. योग्य मानसोपचारतज्ज्ञाकडे गेल्याने त्यांचे अनेक त्रास वाचतात, असे अनुभवाला येते. पण, भावनिक प्रथमोपचार देताना एक पथ्य पाळणे मात्र आवश्यक आहे. ते आहे आपल्या मर्यादांचे.

प्राथमिक पातळीवरील भावनिक ताण कोणते आणि मानसिक आजारात रूपांतर झालेली लक्षणे कोणती याचे प्रशिक्षण घेतल्याशिवाय हे करणे धोकादायक ठरू शकते. चांगली बाब अशी की, ही पथ्ये शिकणे अजिबात अवघड नाही.

शेवटी प्रश्न उरतो भावनिक प्रथमोपचार करायचे म्हणजे नक्की काय करायचे? याचे उत्तरदेखील फार जटिल नाही. आपल्या दैनंदिन आयुष्यात तणावाच्या प्रसंगाला सामोरे जाताना आपण जाणते-अजाणते यांमधील काही गोष्टी करतच असतो. भावनिक प्रथमोपचाराच्यामध्ये ते अधिक जाणतेपणाने आणि शास्त्रीय पद्धती वापरून करणे अपेक्षित असते. त्यामधील पहिली गोष्ट आहे मानवी मन आणि त्याचे आजार याविषयी शास्त्रीय माहिती करून घेणे. ही माहितीदेखील अनेक वेळा जीव वाचवणारी ठरू शकते. गेल्या महिन्यात उल्हासनगर येथे भुताने झपाटले आहे म्हणून मांत्रिकाने केलेल्या मारहाणीत एका मानसिक आजारी व्यक्तीचा मृत्यू झाला. या ठिकाणी 'भुताने झपाटणे असे काही नसते हा एक मानसिक आजार आहे. त्याला उपचार असू शकतो', हे सांगण्याचा भावनिक प्रथमोपचारदेखील व्यक्तीचे आयुष्य वाचवू शकला असता. माहिती देताना भावनिक प्रथमोपचार देणाऱ्या व्यक्तीची भूमिका फार महत्त्वाची असते. ही भूमिका समोरच्याला शहाणपणा शिकवणे अशी असण्यापेक्षा मित्रत्वाच्या नात्याने माहिती अशी असावी. त्यांचा जास्त प्रभाव पडतो. दुसरी गोष्ट आहे, चांगले ऐकण्याचे कौशल्य. एका बाजूला संवाद करण्याच्या माध्यमांचा स्फोट होत असताना दुसरीकडे मात्र समोरच्या व्यक्तीचे म्हणणे आस्थापूर्वक ऐकून घेण्याचे खूपच दुर्मिळ होते आहे. टेन्शन आलेल्या व्यक्तीला एकदम सल्ला देण्यापेक्षा त्या व्यक्तीचे म्हणणे जरी आस्थापूर्वक ऐकून घेतले तरी त्यामधून समोरच्या व्यक्तीची अस्वस्थता कमी होते. ती व्यक्ती स्वत:चा स्वत: विचार करायला लागू शकते. भावनिक प्रथमोपचारांच्यामधील तिसरी महत्त्वाची गोष्ट आहे ते म्हणजे मानसिक आधार देण्याचे कौशल्य. मानसिक टेन्शन आलेल्या व्यक्तीला अनेकदा खूप एकटे आणि आधारहीन वाटत असते. अशा वेळी कोणीतरी आपल्याला समजून घेऊ शकते आणि आपल्या बरोबर आधार द्यायला आहे या भावनेनेदेखील आपण टेन्शनला पळवून लावू शकतो. आणि चौथे महत्त्वाचे कौशल्य आहे समोरच्या व्यक्तीला योग्य माहिती देऊन गरज असल्यास तज्ज्ञाची मदत घेण्यास उद्युक्त करणे. या सगळ्याच्या जोडीने आपण जर मानसिक आरोग्याची जनजागृती करण्यात पुढाकार घेऊ लागलो तर आणखीनच चांगले. अशा प्रकारची जनजागृती काही फार मोठा कार्यक्रम करूनच व्हायला पाहिजे असे नाही, तर आपल्या कुटुंबात, कामाच्या ठिकाणी किंवा समाजात आपण मानसिक आरोग्य आणि त्याचे उपचार याविषयी खुल्या मनाने बोलू लागलो तरी मोठा फरक पडू शकेल. सगळे मिळून आपली भावनिक प्रथमोपचार पेटी तयार होते. गंमत म्हणजे ती ठेवायला जागादेखील लागत नाही. केवळ आपला दृष्टिकोन निकोप आणि सजग असला पाहिजे. जसे आपण शरीराचे प्रथमोपचार करायला शिकतो तसेच जर मनाचे प्रथमोपचार करायला शिकलो तर आपला स्वत:चा आणि आपल्या कुटुंबाचा फायदा तर होईलच; पण समाजाचे मानसिक आरोग्य सुदृढ व्हायला मोठा हातभार लागेल.

अगदी आर्थिक गणित मांडायचे झाले तरी वर्ल्ड बँकेचा नुकताच प्रसिद्ध झालेला एक अहवाल असे सांगतो की, मानसिक आरोग्याचा प्रश्न जर समाजाने एक डॉलर गुंतवला तर त्यावर चार डॉलरचा परतावा मिळू शकतो. कारण सोपे आहे. व्यक्तीचे मन स्थिर राहिले तर स्वाभाविकपणे त्याची उत्पादनक्षमता वाढणार. दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या मानसिक आरोग्याच्या प्रश्नावर आता कुठं तांबडे फुटू लागले आहे. व्यक्ती, कुटुंब आणि समाज म्हणून आपण गांभीर्यपूर्वक याविषयी कृतिशील झाले पाहिजे. कारण मानसिक आरोग्याचा प्रश्न केवळ मानसिक आजारी व्यक्तींपुरता मर्यादित नसून, ज्यांना आपले मन सुदृढ ठेवायचे आहे त्या सर्वांचा आहे.

***





IS 14543:2016
CM/L - 7500096312
प्यास भी बुझाए और इतिहास भी बताए।
fssai
Lic. No. 10016022005592
20TH MARCH ®
RESPECT EVERY DROP
PACKAGED DRINKING WATER
20th MARCH
VENTURES PVT. LTD.
www.20thmarch.com
PRODUCT RANGE
PET BOTTLE
• 200 ML • 500 ML
• 1 LITRE • 2 LITRE
• 5 LITRE
• 20 LITRE JAR
HISTORY
The Name, "20TH March Ventures Private Limited" is inspired and dedicated to the historical agitation by Dr. Babasaheb Ambedkar to the Chawdar Tale (Lake in Mahad) on the 20th of March 1927.
VISION
To grow by 2026 into a top notch commercially viable group of Companies in India that adheres to its Social and Economical Values and Principles.
MISSION
To provide Hygienic, Affordable, Easily Accessible, Packaged drinking water to every Human Being, Irrespective Of Caste, Colour Or Creed...
PRODUCT ON GOVERNMENT "E MARKET PLACE" WEBSITE
MAKE IN INDIA
Ease of Doing Business Through GeM
AUTHENTIC

# श्वासागणिक लढणाऱ्या नजूबाई

**कुटुंबातल्या दहा भावंडांपैकी नजूबाई एक. बालविवाह, शिक्षण चौथीतच उडून गेलेले. माहेरी आणि सासरी उपासमार. आदिवासी म्हणून पिळवणूक. या साऱ्या परिस्थितीत त्यांना कॉ. शरद पाटील भेटले आणि नजूबाईंचं रूपांतर चळवळीत झालं. श्वासागणिक चालणाऱ्या लढाईत, लेखिकेत आणि तुरुंगभोगात झालं.**



घरात दहा भावंडं, घरात अठराविश्व दारिद्र्य, खायला पोटभर कधी मिळालं नाही. जंगलातच वाढलो. खायला मोहाची फुले. भाकरीपण मोहाच्या फुलांच्याच. उकळलेले पाणीसुद्धा मोहाच्या फुलांचेच. अशा वातावरणात आम्ही भावंडं जगलो. शिक्षण माहीत नव्हतं. गावात शाळा आल्यानंतर शाळेत जायला लागले. शिकवलेलं काहीही समजत नव्हतं. अक्षरांशी काही संबंध नव्हता. तरीही शाळेत जात राहिले. जेमतेम चौथीपर्यंत शिकल्यानंतर शाळेशी संबंध तुटला तो कायमचाच. कॉम्रेड नजूबाई गावित यांच्या बालपणाचा हा परिचय.

शहाद्यातील विद्रोही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा, अनेक परिषदा, आंदोलने ज्यांनी गाजविली अशा कॉ. नजूबाई गावित आज वयानं थोड्या थकल्या आहेत. आयुष्यभरात केलेली आंदोलने, पुकारलेला एल्गार, शेतकरी भावंडांसाठी दिलेले लढे, लढाऊ नेते कॉ. शरद पाटील यांच्यासोबतच्या आठवणी सांगताना त्यांच्या डोळ्यात वेगळीच चमक दिसत होती. आज त्यांच्या डोळ्यांना कमी दिसतं. आजारपण अंगाला चिकटलेलं असतानाही शेवटच्या क्षणापर्यंतचे आयुष्य सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षासाठी देणार असल्याचे त्या सांगतात.

आदिवासीतील मावची जमातीत जन्मलेल्या नजूबाई यांची कथा प्रेरणादायी आहे. साक्री तालुक्यातील बोद्रेपाड्यात १० जानेवारी १९५० मध्ये त्यांचा जन्म झाला. घरी २५ बिघे शेती असली तरी ती वडिलांनी कधीच कसली नाही. दहा भावंडे असल्याने उपासमार कायम होत असे. लहान वयातच त्यांचं लग्न झाले. लग्नासाठीही शेठकडून भावाने कर्ज घेतले. लग्नसमारंभ झाल्यानंतर कर्ज फेडले नाही म्हणून त्यांचा बैल शेठने नेला. नवापूर सासर असलेल्या नजूबाईंची सासरीही उपेक्षा झाली. तीन मुलं झाली. तिथेही उपासमार कायम चीच. त्या काळात शेतकऱ्यांचे लढे तीव्र होते. आदिवासी, भूमिहिनांना जमीन कसण्यापासून सरकार रोखत होते. वनजमिनींचा प्रश्न गंभीर होता. लाटीपाडा धरणाकडे

शेतकऱ्यांची अवस्था वाईट होती. सरकारच्या विरोधात जाण्याची कुणाचीही हिंमत नव्हती. अशातच त्या गावातील केशव मास्तरांशी ओळख झाल्यानंतर नजूबाईंना मार्क्सवादी पक्षाची माहिती मिळाली. तेव्हा ठाणे जिल्ह्यात मार्क्सवादी पक्षाची मोठी चळवळ होती. परंतु, नंदुरबार जिल्ह्यात हा पक्ष पोहोचला नव्हता. साक्रीपर्यंत पक्षाचे काम पोहोचल्यानंतर केशव मास्तरांनी अधिक माहिती घेतली. त्या काळात साक्री तालुक्यात कॉ. शरद पाटलांचे काम मोठे होते. त्यांच्यासमवेत कॉ. नामदेवराव गायकवाड, डी. बी. पाटील, रमाकांत देसले आदी कार्यकर्ते काम करीत होते. त्यापैकी आता कुणीही जिवंत नाही. या तरुण मंडळींनी धुळ्यात कॉ. शरद पाटलांची भेट घेऊन शेतकऱ्यांची अवस्था मांडली. चर्चा झाल्यानंतर कॉ. शरद पाटील थेट लाटीपाडा धरणाकडे आले. तेथून त्यांनी आपल्या गावातील सहकाऱ्यांबरोबर थेट चारी खोदून साक्री तालुक्यातील म्हसदीपर्यंत पाणी आणले. धुळ्यालाही पाणी मिळाले. केशव मास्तरांनी पत्रव्यवहार करत कॉ. शरद पाटलांची भेट घेतली. त्यानंतर गोदूताईंची पहिली परिषद पानखेड्याला झाली. डोंगर बागूलचे ते गाव. त्यात जंगल, जमीन, भूमिहिनांच्या प्रश्नांवर आवाज उठवला गेला. या परिषदेनंतर कुणीही शेती करण्यासाठी पुढे येईना; परंतु वादू नावाचा एक आदिवासी मात्र पेटून उठला. त्याने कुदळीने खोदून शेती केली. ज्वारी पेरली, ती इतकी पिकली की शेत पाहण्यासाठी अख्खा आदिवासी गाव आला. ते पाहून सर्वांनी दुसऱ्या वर्षी शेती कसली. मग कॉ. शरद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साक्रीहून नवापूरच्या बाजूला चळवळ सरकू लागली. साक्रीच्या मुली नवापूरला दिलेल्या असल्याने नातेवाइकांशी ओळख करत, त्या भागातील आदिवासी भागातील कारभारी लोकांची भेट घेत सभा घेतल्या. कारभारी सहकार्य करत असल्याने चळवळीने त्या भागात जोर धरला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हळूहळू पसरू लागला. तेव्हा दापूरला कॉ. शरद पाटलांशी ओळख झाली अन् मी चळवळीशी जोडले गेले. आदिवासींना मराठी समजत नव्हते; परंतु मला मराठी समजत असल्याने चळवळ, परिषदेतील भाषणे कळू लागली. तिकडे अहिराणी, मराठीमिश्र असल्याने मला सगळे समजू लागले. कॉ. शरद पाटलांच्या भाषणाने मी खूप प्रभावित झाले. श्रीमंती आणि गरिबी ही नैसर्गिक असते. हा भ्रम कॉ. शरद पाटलांच्या भाषणाने खोडून काढला. परिस्थिती बदलता येते हे या भाषणातून समजले अंस नजूबाई सांगतात.

कॉ. शरद पाटलांनी सर्व आदिवासींना समजावून सांगितले की, लाचारीने जगू नका, तुम्ही या जगाचे, जंगलाचे राजे आहात. पेटून उठा, सन्मानाने जगा. जमिनी भरपूर आहेत, आपण कायदेशीर लढू. जेलमध्ये जाण्याची तयारी ठेवा. त्यांच्या भाषणाने सर्वांमध्ये उत्साह संचारला अन् पहिला मोर्चा नवापूरमध्ये निघाला. त्यानंतर आदिवासी जमिनी कसण्याकडे वळले. त्या वर्षी तुफान पीक आलं. १९७४ मध्ये एसआरपी आल्याने शेती पिकली नाही. तेव्हा खोट्या केसेस दाखल करून आम्हाला जेलमध्ये पाठविण्यात आले. पुढे १९७५ मध्ये आणीबाणी लागली तेव्हाही आम्हाला अटक करण्यात आली. या दोन वर्षांत चळवळ विस्कळित झाली. परंतु, पुन्हा १९७६ मध्ये पुन्हा चळवळीने जोर धरला. आदिवासींनी उठाव केला तेव्हापासून आदिवासी वनजमिनीत शेती करून सन्मानाने जगू लागले. त्यावेळी कॉ. पाटलांना जिल्हाबंदी केली होती. शेती काढून घेतल्याने आदिवासी बांधव मजुरीसाठी गुजरातकडे सरकले. त्यावेळी काँग्रेसची मंडळी आमच्या विरोधात गेली. काहींनी बंड केले. रेश्मा भोयेने एका आंदोलकावर गोळीबारही केला. तेव्हा पुन्हा वीस दिवस आंदोलकांना धुळ्याच्या जेलमध्ये टाकण्यात आले. तेव्हाही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची चळवळ विस्कळित झाली. परंतु कॉ. पाटील यांनी आपण जनलढे तर उभारूच; परंतु कायदेशीर लढायादेखील जिंकू असा विश्वास दिला. १९९५ मध्ये आमच्या बाजूने निकाल लागला देखील. त्यानंतर पक्षाचा वाढदिवस आला; परंतु त्यावेळी काही मंडळी कॉम्रेडच्या विरोधात गेली. त्यांनी परस्पर कार्यक्रम बदलले. पाटलांवर आरोप झाले. बाहेरून आलेल्यांनी मार्क्सवादी पक्ष ताब्यात घेतला. त्या काळी आम्ही साक्रीला आदिवासी स्वायत्त राजाची परिषद घेतली. हरिभाऊ महाले, माधवराव गायकवाड, रामदास आठवले यांना बोलावले होते. विद्यार्थ्यांच्या गाडीला अपघात झाल्याने काही जखमी झाले, तर काही मृत झाले. यावेळी जबाबदार असलेले पदाधिकारी चक्क पळून गेले. या घटना विसरून आम्ही नामांतराची लढाई लढली. तीव्र संघर्ष झाला. रामदास आठवले, बाबा आढाव अशी सगळी मंडळी या लढ्यात सहभागी होती. आम्हीही निघालो परंतु आमच्या कार्यकर्त्यांना मनमाडजवळ अटक केली. काही सुरतमार्गे गेले तेव्हाही पुन्हा अटक झाली. कॉ. शरद पाटलांना अटक झाली. जेव्हा जेव्हा सामाजिक प्रश्न उभे राहिले तेव्हा तेव्हा आम्ही पूर्ण ताकदीने आंदोलने केली. ती राज्यभर केली. सर्वांत जास्त आंदोलने उत्तर महाराष्ट्रात केली. दलित, आदिवासी, ग्रामीण साहित्य संमेलनेही घेतली. त्यातून विचारमंथन झाले.

लेखनप्रवासाविषयी त्या म्हणतात, लेखनाचा प्रवास मोठा विचित्र आहे. कॉम्रेड नियमित सांगत, लिहीत जा, वाचत जा. पुस्तके आणून देत. आग्रह करीत. मोडकेतोडके का असेना पण लिही. तुमच्या आदिवासींचे जीवन भयानक आहे. वास्तववादी आहे ते मांड. मी आनंद यादवांची झोंबी वाचली. तेव्हा त्यात ग्रामीण जीवन दिसले. परंतु, त्याहीपेक्षा आमचे जीवन यातनामय आहे. या कादंबरीने मला लिहिण्याची प्रेरणा मिळाली. आपण लिहिलं पाहिजे असे वाटू लागले. मी सुरुवात केली. वेडंवाकडं लिहिलं. कॉ. पाटलांनी माझी पाठ थोपटली. म्हणाले, 'भारी लिहिलंस नजू तू. तुझ्याकडून खूप काही शिकायला मिळालं'. मग मी मानमोडीपासून लिहायला सुरुवात केली. 'आदोर' पहिल्यांदा लिहिली. मग सुचायला लागलं. तंट्या भिल्ल आहे, उमाजी नाईक आहे, डांग भागात भागोजी नाईक आहे तो अजून उजेडात येत नाही. हे सर्व आलं पाहिजे असे वाटू लागले. मग डांग भागात अभ्यास करून 'भिवा फरारी' कादंबरी लिहिली. भिवाचा आजोबा रावण जो सुरतेच्या लुटीत शिवाजी महाराजांबरोबर लढला. भिवाचा बाप आदिवासींना घेऊन लढला. त्यापैकी कुणीही परतले नाही. भिवानेही इंग्रजांशी लढे दिले. अशाप्रकारे आदोर, रोप, रोपणी, पोराळी या चार खंडाची एकत्रित 'तृष्णा' ही आत्मवृत्तपर कादंबरी अस्तित्वात आली. त्यानंतर मी बऱ्याच कथा लिहिल्या. 'प्रतिक्रांती' ही कादंबरी प्रसिद्धीच्या मार्गावर असून, पुढेही लिहिण्याचा मानस आहे; पण प्रकृती साथ देत नाही ही खंत आहे.

**(शब्दांकन : प्रवीण खरे)**

***


बुक पोस्ट



बी. जी. वाघ,
निवृत्त सनदी अधिकारी

# सत्याची तहानच मूलभूत प्रेरणा

'द ताओ ऑफ फिजिक्स' हे काप्रा यांचे एक गाजलेले पुस्तक आहे. मुळात ते भौतिक शास्त्रज्ञ असले तरी धर्म, तत्त्वज्ञान, अध्यात्म (mysticism) यातील अंर्तसंबंधांवर त्यांनी सखोल संशोधन केले आहे. विज्ञानाच्या पलीकडेही एक विज्ञान असते असे मानणारे काही संशोधक/शास्त्रज्ञ आहेत. मन आणि जड जगत (matter) यातील अंर्तसंबंधावर विज्ञानाला अद्यापही निश्चित भूमिका घेता आलेली नाही. सत्याची तहान ही मानवी मनाची मूलभूत प्रेरणा आहे. त्याशिवाय माणसाचा नैतिक व भौतिक विकास शक्य नाही. सत्याची ही दृष्टी नसेल तर मानवी जीवन विज्ञान असूनही दिशाहीन ठरेल.




काप्रा यांचे turning point, uncomman wisdom, the web of life ही सर्व याच विचार प्रवाहातील पुस्तके. मानवी शहाणपण आहे ते सर्व संकल्पनांच्या मुळाशी जाण्यात. आपण जगाला आतून जाणत नाही. म्हणून काप्रा (fritjof capra) यांनी आधुनिक भौतिक विज्ञान (physics) आणि पूर्वेकडील अध्यात्म, धर्म, तत्त्वज्ञान यातील मूळ संकल्पनांतील साम्य स्थळे, स्रोत शोधण्याचा प्रयत्न केला आहे. आपण ज्याला पूर्वेकडील गूढवाद (mysticism) म्हणतो त्यामागील संकल्पनातील सत्य किंवा विज्ञान शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्याच्या क्षेत्रातील प्रख्यात विचारवंतांशी, शास्त्रज्ञांशी व गूढवाद्यांशी त्यानं चर्चा केली आहे. तत्त्वज्ञानाला विज्ञानाची माता समजली जाते (philosophy is the mother of science). विज्ञानाचे मूलभूत सिद्धांत तत्त्वज्ञानातूनच आलेले आहेत. ज्ञानाचा मुख्य स्रोत अनुभव हाच आहे. आपण सत्याला अनुभवले नाही तर ते सत्य नाही असे बुद्धाने म्हटले आहे. कारण बुद्ध अतार्किक, काल्पनिक अनुभवांना अनुभव मानत नाहीत. परंतु, गूढवाद्यांचे अनुभव तार्किक असतीलच असे नाही. गूढवादी तर्काच्या पलीकडे जाऊन निव्वळ मनाच्या सहाय्याने (intutional) सत्याला जाणण्याचा प्रयत्न करतो. त्याला कुठल्या तरी वेगळ्या विश्वाची चाहूल लागते. ती मनाची अज्ञाताकडे घेतलेली झेप असते. स्थळ काळाच्या मूळ संकल्पना अशा शोधातूनच लागलेल्या आहेत. 'द ताओ ऑफ फिजिक्स'चा प्रवास हा अशा गूढ वाटणाऱ्या अध्यात्मापासून (mysticism) सुरू होतो. त्या आधी लेखकानेही तसा एक अनुभव घेतलेला असतो. समुद्रकिनारी बसलेला असताना त्या वैश्विक चेतनेचा, विश्वलहरींचा अणूनर्तनाचा त्याला अनुभव येतो. जे ज्ञान (पुस्तकी) त्याला झालेले असते त्याची प्रचिती येते. पुस्तक लिहिण्यामागील त्याची प्रेरणा अर्थातच त्या सम्यकतेकडे जाण्याची आहे. जिथे वेगवेगळे विचारप्रवाह एकत्र येतात. हिंदू, बौद्ध, ताओ, झेन, तांत्रिक बुद्धिझम, शाक्त वा शैव पंथ यातील वेगवेगळ्या धार्मिक संकल्पना यानिमित्ताने तो तपासतो. त्याला त्यांच्यात आश्चर्यकारक

साम्य आढळते. याचे कारण माणसाच्या मनाची प्रतिभेची अथांगताच होय. तो शब्दांपलीकडील व प्रचलित संकल्पनात्मक (conceptual) ज्ञानापलीकडील निव्वळ जाणिवांचा प्रवास असतो. हा प्रवास आनंददायक असतो, कारण येथे तर्क गळून पडलेला असतो. झेन मास्टर देईटो सम्राटाला म्हणतो, 'महाराजा, आपण हजारो कल्पापासून दूर आहोत आणि क्षणभरही आपण वेगळे झालेलो नाहीत. आपण एकमेकाला नेहमीच पाहतो; परंतु आपली एकदाही भेट झालेली नाही'. हा अनुभव म्हणाल तर भौतिक आहे. अधिभौतिकही आहे. सत्याजवळ असणाऱ्या माणसाला हा अनुभव नेहमीच येतो. ते सत्य जवळ असते परंतु आपल्याला भेटलेले नसते. झेनचा संबंध ताओशी आहे आणि ताओचा संबंध बुद्धाशी आहे. त्यांच्या विचारात एक आश्चर्यकारक गतिशीलता आहे. मुळात हे जग स्थिर नाही ते बदलते आहे हा बुद्धाचाच मूळ सिद्धांत आहे. पुढे तो हेराक्लीट्स या ग्रीक विचारवंताने मांडला. हेराक्लीट्सने म्हटले आहे की, हे जग म्हणजे निरंतर बदलाची प्रक्रिया आहे. (continuous flow of change) कारण ती परस्परविरोधी शक्तींनी कार्यान्वित आहे. ताओ तत्त्वज्ञान या शक्ती यिंग (ying) आणि यांग (yang) स्वरूपात येतात. त्यातून ताओचे एक सूत्रही सिद्ध होते की, मी जाणतो म्हणजे मी काहीच जाणत नाही (I know and I Know nothing). जगात अंतिम ज्ञान आहे का? नाही. जगात अंतिम सत्य आहे का? नाही. जग जर सातत्याने बदलणारी वस्तुस्थिती असेल तर आपले ज्ञान अंतिम असणार नाही. ते सापेक्षच असेल. आईनस्टाईनचा सापेक्षतेचा सिद्धांत हा नंतर येतो. स्थळ, काळ, प्रकाशाची गती यांचे अस्तित्व सापेक्षच आहे. प्रकाशाची गती वाढवली तर स्थळ, काळ अस्तित्वातच राहणार नाहीत. बुद्ध, ताओ, झेन यांची विचारपद्धती वेगवेगळी वाटत असली तरी त्या कार्यकारण संबंधांचे (causal relationship of all things) सखोल विश्लेषण करतात. या अर्थाने त्या विज्ञानाला मार्गदर्शन करणाऱ्या आहेत. बुद्धाचा प्रतित्य समुत्पाद हा सिद्धांत विज्ञानाची उभारणी करणारा आद्यसिद्धांत आहे. हे विश्व म्हणजे परस्परसंबंधांची सहअस्तित्वाची एक साखळी (web of existence) आहे. त्यामुळे तुम्ही एकाला नष्ट केले तर सर्वच नष्ट होईल. लाओ त्सेने हा विचार अधिक स्पष्ट केला आहे. आधुनिक भाषेत आपण त्याला Ecological Balance किंवा Biodiversity म्हणतो. ती जपली नाही तर जग नष्ट होईल. हे जग आपण काही वैज्ञानिक फूटपट्ट्यांनी मोजण्याचा प्रयत्न करतो, परंतु त्याला काही मर्यादा पडतात. हायझेनबर्गने म्हटले आहे प्रत्यक शब्द, संज्ञा, संकल्पना यांना अंगभूत अशा मर्यादा आहेत. सत्याला शब्दात पकडता येत नाही. सत्य ही फार विशाल संकल्पना आहे किंवा सर्व संकल्पनांच्या पलीकडील ती आहे. ती समजण्यासाठी मनाची एक वेगळी अवस्था असते. (non ordinary state of consciousness) किंवा तिला ध्यान समाधी म्हणतो. आपण जेव्हा तर्काने जाणतो तेव्हा वस्तुस्थितीचे खंडित ज्ञान आपल्याला होते. तो समग्र अनुभव होऊ शकत नाही. समग्र अनुभवासाठी आपल्याला सम्यक दृष्टीची (wholesome approach) आवश्यकता असते. ताओ तत्त्वज्ञानात या समग्रतेवर विशेष भर देण्यात आला आहे. बुद्धकल्पना प्रधानतेला मान्यता देत नाही. त्यामुळे आपण एका सापळ्यात अडकण्याची शक्यता असते. पूजापाठ, स्वर्ग-नरक, देवदेवता, कर्मकांड या निव्वळ कल्पना आहेत. त्याला वैज्ञानिक आधार देता येत नाही. आधुनिक विज्ञान तपासताना लेखकाने बौद्ध, ताओ, झेनवरच जास्त जोर दिलेला आहे. कारण या ईश्वर नाकारणाऱ्या तर्क (logic), अंत:प्रेरणा (intution) यांचा मेळ घेणाऱ्या आहेत. ताओवाद हा मुळात व्यवहार्यतावाद आहे. त्याला विज्ञानाचे अध्यात्म म्हणता येईल. विज्ञानातील सूत्रांचा (Tao physics) जीवनात वापर करून ते अधिक आनंदित, सुखकारक आणि उन्नत कसे होईल ते ताओवाद आपल्याला शिकवते. बुद्धाला जाणायचे असेल तर निसर्गाचे बुद्ध स्वरूप जाणावे असे झेन तत्त्वज्ञान सांगते. झेन मुळातच बुद्धाचे चिंतनशील रूप आहे. एखाद्या कळीला नष्ट करून त्याचे आपण फुलात रूपांतर करू शकतो का हा प्रश्न झेन, ताओ विचारतात. बुद्धानेही तो विचारला आहे. मुळात बदल (transformation) हा धर्म, तत्त्वज्ञान, अध्यात्म (mysticism) आणि विज्ञान यांना जोडणारा प्रश्न आहे. त्यातील अंर्तसंबंध जाणण्याचा लेखकाने मनापासून प्रयत्न केला आहे. माणसाला ज्ञान हवे की शहाणपण (uncommon Wisdom) हा मूलभूत प्रश्न आहे. हिंदूंची 'तत्त्वमसी' ही कल्पना खूप व्यापक आहे. ईश्वर आणि हे विश्व दुसरीकडे कुठे नसून, तुझ्यातच आहे की कल्पना तशी क्रांतिकारकच आहे. त्यामुळे कुठे मंदिर बांधण्याचा प्रश्नच येत नाही. पूजा आणि कर्मकांडाचाही प्रश्न येत नाही. बुद्धानेही वेगळ्या पद्धतीने हेच सांगितले. परंतु हिंदूंनी वर्णव्यवस्था स्वीकारल्यामुळे मानव, समाज आणि विश्व यात भेद निर्माण करणारी एक विकृत व्यवस्था जन्माला आली. हिंदूतील 'मायावाद' कर्मवाद याची चर्चा करण्याची गरज नाही. लेखकानेही ती केलेली नाही. वेद, उपनिषदे, गीता यांनी वेळोवेळी एकत्वाचा उद्घोष केलेला आहे. परंतु, व्यवहारात ते तत्त्व अवलंबिलेले नाही. विश्वाच्या निर्मितीबाबत ताओवाद्यांनी अधिक शास्त्रीय परिकल्पना दिलेली आहे. ती सध्याच्या (Big Bang) सिद्धांताजवळची आहे.

**द ताओ ऑफ फिजिक्स**
**लेखक – फ्रिजोफ काप्रा**
**प्रकाशक – फ्लेमिंगो**
**किंमत – ४९९ रुपये**

***



# राफेल, राफेल पुन्हा राफेल, गद्दारी जिंके, इमानदारी फेल

जे मोठमोठ्याने देशाविषयी सत्याविषयी बोलत असतात त्यांच्याच मनात या दोन मूल्यांविषयी शंका असते. जे या दोन मूल्यांविषयी पुन्हा पुन्हा अकारण बोलत असतात त्यांच्याच चारित्र्याला तडा गेलेला असतो, असं एक चिनी वचन आहे. हे आठवायचं कारण म्हणजे भारतात गाजत असलेल्या राफेल प्रकरणात खूप मोठा झालेला कथित भ्रष्टाचार. साऱ्या मलाईचा धनी अंबानी बनला आहे, असे देश-विदेशातील सारेच लोक बोलत आहेत; पण ग्लोबल नीतीचं तंत्र वापरून खऱ्याचे खोट्यात रूपांतर करण्याची कलकत्तावाली विद्याप्राप्ती असलेल्या बीजेपीनं आणि त्यांच्या सरकारनं कधीच हे मान्य केलं नाही. दिल्लीपासून शिकॅगोपर्यंत भागवत पुराणाचा सप्ताह चालवून धर्मवादाचा महाप्रसाद देणाऱ्यांनीही ते मान्य केलं नाही. पण कोंबडं झाकलं तर सूर्य उगवायचा थांबत नाही किंवा पाण्यात दाबलेली घाण वर यायची थांबत नाही त्याचप्रमाणे राफेलचा काळा चेहरा उजेडात येतोच आहे. वक्तृत्व स्पर्धेत बक्षिसं जिंकणाऱ्या मोदींची ट्रोल सेना, नागपूरमधील त्यांचा मातृपक्ष या साऱ्यांनी खूप प्रयत्न केला, पण आता कोट्यवधी रुपये भ्रष्टाचाराचे प्रकरण हळूहळू बोलते होत आहे.

राफेल विमान करारासाठी भारतात सरकारनेच अनिल अंबानींचं नाव भागीदार म्हणून सुचवलं होतं असं खुद्द फ्रान्सचे माजी अध्यक्ष फ्रान्वा औलांद यांनी उघड केलं आहे. संरक्षण दलासाठी विमाने खरेदी करण्याच्या करारात झालेला भ्रष्टाचार केवळ आर्थिक कारणापुरता मर्यादित राहत नाही तर ती देशाविरुद्ध केलेली गद्दारी असते. बेईमानी, विश्वासघात असतो. राष्ट्रद्रोह म्हणतात तो यालाच! सरकारवर टीका करणाऱ्याला नव्हे. बोफोर्स प्रकरणी आवाज उठवणारेच आता तशाच प्रकारचा भ्रष्टाचार करू पाहत आहेत आणि सत्तेच्या जोरावर तो झाकू पाहत आहेत. भारताच्या धरतीशी इमान राखणारी आणि अनेक पेचप्रसंगात भारताला विजय मिळवून देणारी एच.ए.एल.सारखी प्रामाणिक आणि प्रभावी संस्था सोडून मोघ बनिया जातीच्या आणि देश लुटत असलेल्या अंबानीला का दिली? असा प्रश्न सारा देशच विचारेल. कुणाकुणाचे तोंड दाबणार? कुणाकुणाला पप्पू आणि राजकुमार ठरवणार, हा प्रश्न येईल. राफेल हा एक मोठा हिमनग आहे. त्याचं एकच टोक दिसत आहे. राष्ट्रप्रेमाचा, नव्या राष्ट्रवादाचा बुरखा अजून पूर्णपणे फाटायचा आहे. देशातला गॅस, सोनं, धान्य, सिमेंट, टी.व्ही., तेल एवढंच नव्हे तर रद्दी, भंगार, जुनी टायरही खाणाऱ्या अंबानीवर मोदी एवढे उदार का? जे स्वत:ला देशाचे चौकीदार समजतात ते एवढे मेहेरबान का? याचं उत्तर असं आहे की नव्या व्यवस्थेत चौकीदारच अधिक गुन्हे करतो. चोऱ्या-माऱ्या, लूट-दरोडे, यापैकी घडलेलं कोणतंही प्रकरण घ्या. त्यात एक फितूर चौकीदार असतोच.

देशाच्या मिळकतीत देशाच्या संरक्षण व्यवस्थेत, देश म्हणून करावयाच्या करारात होणारी किंवा होऊ घातलेली बेईमानी म्हणजे गद्दारीच असते. वक्तृत्वपटू असलेल्या मोदींनी आता दुसऱ्या कोणत्या तरी वक्तृत्व स्पर्धेत भाग घेऊन यावरही भाषण करावं आणि संघाच्या चरणी बक्षिसं अर्पण करावीत.

देशाच्या एका मोठ्या आणि महत्त्वाच्या व्यवहारात सहभागी झालेल्या अंबानीने विमान प्रकरणी जी भागीदारी कंपनी स्थापन केली, तिचे वय केवळ १५ दिवसांचे आहे हेही आताच उजेडात आले आहे. अशा परिस्थितीत एकूणच संरक्षण विभागाकडे पाहण्याचा सरकारचा दृष्टिकोन किती गढूळ आहे हेही लक्षात येतंय.

***

# वंचितांचं संचित

जातिभेदाच्या विषमतेवर आधारित असलेल्या किंवा बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांक अशा गणितावर उभ्या असलेल्या समाजात वंचितांचे एकत्र येणे किंवा त्यांनी आपले शक्तिरूपी संचित एकत्रितपणे वापरणे प्रस्थापितांना कधीही अडचणीचं ठरतं. प्रस्थापितांची राजकारणात, समाजकारणात आणि वर्गकारणात सत्ता कायम टिकून रहायची असंल तर वंचित नेहमी तुकड्या-तुकड्यांत विभागावे लागतात किंवा विभागून ठेवावे लागतात. राजकारणात तर या सिद्धांताला खूप महत्त्व आणि अर्थ आहे. सध्या वंचितांचं राजकारण ही संकल्पना प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली पुढं येतेय किंवा आली आहे. तिचा वेगवेगळ्या पद्धतीने अर्थ लावला जातोय. अर्थ १) वंचितांनी स्वतंत्रपणे उभे रहायचे ठरवले तर आगामी निवडणुकांत भाजपला लाभ होईल. तोच प्रश्न पुन्हा सत्तेवर येईल. २) काँग्रेसने जो पुरोगामी पक्षांना आणि घटकांना एकत्र करण्याचा प्रयत्न चालवला आहे त्याचं नुकसान होईल. ३) मूलतत्त्ववादी आणि जातीयवाद्यांशी लढणं कठीण होईल. ४) काही झालं तरी वंचितांनी पुरोगामी आघाडीतच सहभागी व्हावं. ५) २०१९ च्या निवडणुका भाजपच जिंकेल तर ती शेवटची निवडणूक ठरेल.

यांसह अनेक निष्कर्ष उथळपणे मांडले जात आहेत आणि ते सारे राजकीय पटलावर घेण्या-देण्याचे आहेत. वास्तव हे आहे की, वंचितांनी कोणत्याही मोठ्या पक्षाबरोबर जायचं ठरवलं तर सर्वप्रथम त्यांची वाढ खुंटते किंवा खुंटवली जाते. त्यांचा बोन्साय केला जातो. बोन्साय केलेलं झाड सावली किंवा फळं देऊ शकत नाही. सावलीसाठी तेच मोठ्या झाडावर अवलंबून राहतं. वंचित जेव्हा मोठ्या बरोबर राजकीय लाभाच्या ठिकाणी जातात तेव्हा मोठे त्यांचे बळ, त्यांची लोकसंख्या मोजायला लागतात. स्वाभाविकच बळ दाखवून लाभ मिळवण्याची शक्यता यांच्यात नसते. मोठे देतील तो तुकडा आणि संख्यात्मक गणितात बसेल तो तुकडा स्वीकारावा लागतो. काहीच मिळालं नाही तर मोठ्यांची पालखी वाहून नेण्याचा मान मिळतो. म्हणजे मोठे पालखीत आणि सारे वंचित पालख्यांचे भोई होतात किंवा ते केले जाते. आता हे टाळण्यासाठी मार्ग कोणता? आणि एकच मार्ग शिल्लक राहतो आणि तो म्हणजे साऱ्या वंचितांनी एकत्र येऊन आपापली शक्ती



एकवटण्याचा. त्यातून लाभ कदाचित कमी मिळेल किंवा प्रसंगी मिळणारही नाही पण सारे वंचित दबावगटात रूपांतरीत होतात. राजकारणात-समाजकारणात दबावगट झाला की मग पालखीला वर्षानुवर्षे खांदा द्यायचं काम उरत नाही. दबाव कायम टिकून राहिला तर त्याचे राजकीय शक्तीतही रूपांतर होतं आणि या शक्तीची मदत घेतल्याशिवाय मोठे काहीच करू शकत नाहीत. खरं तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हीच गोष्ट थोड्या वेगळ्या शब्दांत खूप वर्षांपूर्वी सांगून ठेवली आहे.

काँग्रेसनं साऱ्या वंचितांना एकत्रित करून त्यांचा योग्य वाटा देण्याऐवजी या वंचितांमधले काही घटक फोडून त्यांच्यासमोर तुकडे टाकण्यास सुरुवात केली. तुकडे पद्धतीला प्रतिष्ठा मिळवून दिली. परिणाम, वंचितांमधले काही तुकडे या पद्धतीत मोठे झाले तर बाकीचे तसेच राहिले. तुझी एत्ता कंची, तुझी लोकसंख्या किती, असे प्रश्न विचारले जाऊ लागले. स्वाभाविकच मोठे विकास पावत गेले आणि छोटे भकास होत राहिले. हा खेळ किती काळ चालणार आणि त्यात कोण कोण भकास होणार हे कुणाला सांगता येणार नाही.

आता प्रश्न तयार झाला तो वंचितांच्या आघाडीत मुस्लिमांनी प्रवेश करण्याचे ठरवल्यानंतर. खरे तर काँग्रेसनं वर्षानुवर्षे मुस्लिमांना काखेत घेतले. भाजपने मारून मुटकून धमकी देऊन का होईना मुस्लिमांना काखेत मारलं; पण तेव्हा काही आजच्यासारखा प्रश्न निर्माण झाला नाही. वंचित म्हणजे केवळ नवबौद्ध आणि मुस्लिम नव्हेत. सामाजिक, आर्थिक आदी सर्वहारा वर्ग म्हणजे वंचित आहे. आदिवासी, वंजारी, बंजारा, भटके, विमुक्त, महिला आदी सगळेच त्यात आले. खरंच वंचित एक झाले तर राजकीय गणितं बदलतात याची खात्री प्रस्थापितांना वाटते म्हणूनही ते भाजपला रोखण्यासाठी वंचितांच्या राजकीय ऐक्याला विरोध करत आहेत. दलित-मुस्लिम आघाडी करणारे जोगेंद्र कवाडेंना काँग्रेसने, राष्ट्रवादीने कसे स्वीकारले? आपल्या पक्षात मुस्लिम मोठ्या प्रमाणात आणू असा दावा करणाऱ्या रामदास आठवलेंना भाजपने कसे स्वीकारले? डाव्यांनी मुस्लिमांना कसे स्वीकारले? अगदी शिवसेनेनं मुस्लिमांना जवळ करून त्यांच्यापैकी एक-दोघांना मंत्री कसं केलं? ओवेसी नावाचा कोणी तेव्हा नव्हता पण कोणीतरी त्यांचा डुप्लिकेट असेलच ना! काही महापालिकांच्या निवडणुकीत अन्य मोठ्या पक्षांनी छुप्या पद्धतीनं का होईना ओवेसींची मदत घेतलीच होती ना? अगदी राष्ट्रवादाच्या नावानं गळे काढणाऱ्यांनीही घेतली होतीच ना? मग आता काय घडतंय? वंचित एकत्र येण्यानं जी काही धास्ती वाटू लागली आहे किंवा निर्माण केली जात आहे त्यातूनच हे सारं घडतंय.

***

# सत्ता मस्तवाल तेव्हा पुढाऱ्यांच्या जिभा सुटतात

सत्ता माणसाला भ्रष्ट करते, खरंच भ्रष्ट बनवते... सत्ता माणसाला बेजबाबदार बनवते, सत्ता नैतिक अधःपतनाला कारणीभूत ठरते आणि सत्ता माणसाला मस्तवालही बनवते अशा एक ना अनेक गोष्टी सत्तेविषयी सांगण्यात आल्या आहेत. त्या थोड्या अतिशयोक्ती आणि विधायकतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या असल्या तरी सत्तेची ही ठळक वैशिष्ट्ये सातत्याने नजरेसमोर येत असते. सत्ता माणसाला शुद्ध आणि अशुद्धही करते. सत्ता माणसाला बेतालही बनवते. बेताल म्हणजे ताल नसलेले. आता हे कधी तरी राज्यशास्त्राचा विद्यार्थी म्हणून शिकलेही. सध्या आठवायचं कारण म्हणजे गेल्या आठवडाभरात भाजपच्या नेत्यांनी केलेली विधानं होय. एक शिक्षणमंत्री प्रकाश जावडेकर, दोन-एकही आमदार, खासदार निवडून न आणणाऱ्या अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे नेते रामदास आठवले (जे भाजपने दत्तक घेतले किंवा हे दत्तक गेले अर्थात ङ्कजयभीमफ म्हणत) आणि छत्तीसगडचे लोकप्रिय आणि अभ्यासू, आदर्श खासदार निशिकांत दुबे. अलीकडेच बेस्ट खासदार म्हणून त्यांना बक्षीस मिळालं आणि तिसरे आपले कदमांचे पोपटवाले राम. कारण ते पोपटासारखे बोलतात. पोपटवाले जोशी नसूनही...

...तर जावडेकर यांनी शिक्षकांना आणि इतरांना एक गोष्टी अशी सुनावली की, कोणीही हातात थाळी घेऊन शाळेची भीक मागण्यासाठी सरकारच्या दारात येऊ नये. आपलं आपलं बघावं म्हणजे इतरांकडे भीक मागावी. आता प्रश्न येतो समाजानं सरकारकडे शाळा मागायची नाही तर अंबानींकडे, राजकीय बनलेल्या साधू-संतांकडे की रेशीम बागेकडे? सरकारच्या दारात येऊ नये याला काही अर्थ नाही. जणू आपणच स्वतःच देशाचे मालक आहेत असे समजून जावडेकरांनी बोलू नये. सरकार म्हणजे जनताच असते. तिच्याच पैशातून सरकार चालतं. जावडेकरांचा विमानाचा खर्च आणि पगार त्यातूनच भागतो. पण, सत्ता एखाद्याला मालक कशी बनवते हेही जावडेकरांच्या विधानातून शिकता येईल. सरकार म्हणजे जावडेकर नव्हेत आणि शाळांना जावडेकर स्वतःचे पैसे देत नाहीत. एकीकडे शिक्षणाचा हक्क आहे. तो अमलात आणायचा तर शाळा लागतील आणि ते द्यायचं काम सरकारला करावं लागणार आहे. सरकारी शाळा बंद पडल्या तर कुठल्या ज्ञान प्रबोधिनीतल्या पोरांचे नुकसान होणार नाही



तर गरीब पोरांचंच नुकसान होणार आहे. त्यांना शिकता येणार नाही आणि न शिकल्यामुळे जगता येणार नाही. खरं तर त्यांनी शिकू नये आणि जगू नये अशीच नव्या भांडवलशाही व्यवस्थेची इच्छा आणि व्यूहनीती आहे. कदाचित जावडेकर ती पूर्ण तर करत नसतील?

आता दुबेंचं बघा. एका सार्वजनिक कार्यक्रमात पवन साह याने अक्षरशः दुबे यांचे पाय धुतले आणि ते पाणी सेवन केले. साह जातीतला. पाय धुतल्यानंतर पाणी गढूळ झाले; कारण बहुतेक पुढाऱ्यांचे पाय मातीचेच असतात. मूल्ये, नैतिकता आणि चारित्र्य बुडवून ते घाण होतात. तरीही साह याने तेच पाणी सेवन केले. दुबे म्हणाले, ङ्कमाझ्या जीवनातील हा सर्वांत सुंदर क्षण होता. आता यात सुंदर कायफ वरच्या माणसाच्या पायाचं पाणी खालच्या माणसानं पिण्यात सुंदर काय? हे कमी होतं म्हणून की काय ङ्कअतिथी देवो भवफ ही आमची परंपरा आहे असं दुब्यांनी सांगितलं. आता आपल्या संस्कृतीत फक्त ब्राह्मण अतिथीच देव होतो. पारधी कधी देव होत नाही. एका गोंडस नावाखाली जुन्या-जीर्ण संस्कृतीचं पुनरुज्जीवन करण्याचं कारण काय? पण सत्ता हे सारं करायला प्रोत्साहन देते. मस्तवाल बनवते. लोकांनी निवडून दिलेल्या लोकांचा हा भला मोठा अपमान आहे. मतं मागताना पाया पडायचं आणि निवडून आल्यावर पाय धुऊन पाणी प्या म्हणायचं ही कुठली लोकशाही? खरं तर अशा कृत्यांविरुद्ध अॅट्रॉसिटी दाखल करायला हवी; पण मदमस्त बनलेल्या सत्तेला कोण विचारणार?

आता आपले रामदास आठवले महागाईवाढीनं होरपळणाऱ्या समाजाला दिलासा देण्याऐवजी म्हणाले, पेट्रोलदरवाढीचं मला काय वाटत नाही; कारण सरकारच मला मोफत पेट्रोल देतं. ज्याला इंधन विकत घ्यावं लागत नाही त्याला इंधनवाढीची काय पर्वा? आता इथं एक गफलत आहे ती म्हणजे सरकारही इंधन विकत घेत असतं आणि तेही लोकांनी करापोटी भरलेल्या पैशातून. म्हणजे मागील दारानं प्रवेश करण्याचं पेटंट ज्यांच्याकडे आहे त्या आठवलेंना जे काही फुकट मिळतं त्याचे पैसे जनतेनं भरलेले असतात. त्यात ङ्कजयभीमफ्वाले आले आणि ङ्कभारतमाता की जयफ्वालेही आलेच. अर्थात हे आठवलेंना कसं काय आठवलं नाही? खरं म्हणजे आठवलं असतं तर त्यांना आठवले हे आडनाव मिळालं नसतं. ते बिचारे जगप्रसिद्ध वात्रटिकाकार झाले आहेत. ते वात्रटिका किंवा चारोळ्या करायला लागल्यापासून लोकांनी नाटक, सिनेमाकडे पाठ फिरवली आहे. उद्या मनोरंजनवाले आठवलेंना म्हणतील की, तुमच्या चारोळ्यामुळे आमचं नुकसान होत आहे, त्या बंद करा. यावर आठवले असंही म्हणतील की, चारोळ्यासाठी मला पैसे खर्च करावे लागत नाहीत. त्यांचं लेखन फुकट. श्रोत्यासाठी ऐकणं फुकट. त्यातून होणारं मनोरंजनही फुकट आणि राष्ट्रसेवाही फुकटच...

आता हे कदमांचे आणखी एक राम. महिला मुक्तीसाठी, तिच्या प्रतिष्ठेसाठी जगभर प्रयत्न सुरू असल्याच्या काळात या रामानं तरुणांना सांगितलं की, तुमच्यावर प्रेम करणाऱ्या पोरींना पळवून आणू आणि तुमच्याशी लग्न लावू. वा बहादूरी म्हणतात ती यालाच! मुली पळवून आणण्यासाठी जणू आपल्याकडे गँगच आहे अशा आविर्भावात ते बोलून गेले. आपल्या प्रतिमा आणि फोटोंना जोडे बसायला लागल्यावर त्यांनी खुलासा केला. अगोदर चिखल फेकायचा आणि नंतर माफी मागून डाग साफ करण्यासाठी हप्त्यावर घेतलेल्या साबणाचा तुकडा वापरायचा ही तर भाजपची संस्कृतीच झाली आहे. पण, अशी विधानं करण्यासाठी यांना बळ येतं कोठून? कोण देतं ते हेही जगजाहीर झालं. सत्तेतून यांना बळ मिळतं. पोरी पळवून आणतो म्हणण्यापर्यंत ते जातं. आपल्या महाकाव्यात, पुराणात धनुष्य उचलून, माशाचा डोळा फोडून, पराक्रम गाजवून, ज्ञान आणि प्रेम व्यक्त करून जीवनसाथी जिंकण्याची प्रथा होती आणि हे कदमांचे राम सांगतात ती पद्धत थोडी वेगळीच. रानटी आणि काळाला मागं नेणारी. आठवले यांचा राम आणि कदमांचा राम आणि पाय धुवायला लावणारे दुबे या सर्वांनी माफी मागितली. पण शेवटी ङ्कजो बुंद से गयी वो गयीच रे मुन्नाभाई। वो हौद से कैसे आये...।


***

# कर्नाटकात सावित्रीबाई

महात्मा फुले यांच्यावर चित्रपट काढावा आणि शासनाच्या अर्थसहाय्यातून तो काढावा यावर सुरू झालेली चर्चा आता वयात आली. म्हणजे सज्ञान होऊन अठरा वर्षांची झाली; पण चित्रपट काही आला नाही. आचार्य अत्र्यांनंतर असा चित्रपट काढण्यासाठी पुरोगामी महाराष्ट्रात खरं तर फुले, शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात एकही इ्माय का लालफ पुढं आला नाही. क्रांतिज्योती सावित्रीबाईंचीही तीच अवस्था. पुणे विद्यापीठात महात्मा फुले यांचा छगन भुजबळांनी तयार करून दिलेला पुतळा बसवण्यात विद्यापीठातील पांढरपेशी राजकारण काय काय करत होतं हे खासगीत होईना सर्वांनाच ठाऊक आहे. सावित्रीबाईंची कविता कधी पाठ्यपुस्तकात येऊ दिली जात नव्हती. मतांच्या पेट्या भरून घेण्यासाठी फुल्यांचं नाव ऊठसूट घेणारे आणि उचक्या देत का होईना हे नाव घेणारे लोक महात्मा फुल्यांचा आणि सावित्रीबाईंच्या विचारांचे चित्रपटरूपी स्मारक उभारत नव्हते. पण या क्रांतिकारी पती-पत्नीच्या विचारांचा परिणाम जगभर झालाय. कर्नाटकातही परिणाम झाला आणि लेखक सर्जू काटकर यांनी सावित्रीबाईंच्या जीवनावर सुंदर कादंबरी लिहिली. खरं तर, मराठीत अशी कादंबरी अजून यायची आहे. मराठीतलं बरंच साहित्य अजूनही विचार गोळा करण्याऐवजी रंजन गोळा करण्यात गुंग आहे. तर काटकर यांच्या कादंबरीवर कानडीमध्ये तीन तासांचा चित्रपट विशाल राज यांनी दिग्दर्शित केलाय. प्रसिद्ध गायिका तारा हिनं सावित्रीबाईंची तर सुयेंद्र प्रसाद यानं महात्मा फुल्यांची भूमिका केलीय. हा चित्रपट एकाच वेळी बहात्तर चित्रपटगृहांत प्रकाशित झाला आणि त्यानं साऱ्या व्यावसायिक चित्रपटांना मागं सारत समीक्षकांकडून तीन-चार चांदण्या मिळवल्या. कर्नाटक सरकारही जागं झाले आणि त्यानं राज्यभरातल्या सर्व सरकारी शाळांत हा चित्रपट दाखवण्याचं फर्मान काढलंय. म्हणजे सावित्रीबाई घराघरांत आणि मनामनात जाणार हे नक्की. व्यवस्थेविरुद्ध लढत स्त्री



सावित्रीबाई आणि जोतिराव यांच्या भूमिकेत तारा आणि सुयेंद्र प्रसाद.




**सर्जू काटकर यांच्या 'सावित्रीबाई फुले' या कादंबरीचं मुखपृष्ठ.**

शिक्षणाला चालना देणारी, देशातील पहिली महिला शिक्षिका अशा विशेषणांनी जणू काही क्रांतिज्योतीच्या विचारांचा उत्सव कर्नाटकात चालू आहे. सावित्रीबाईंचा जन्मदिन हाच शिक्षण दिन असावा अशी मागणी पुढं येत आहे. सर्व महिलांचा आत्मसन्मान वाढतो आहे.

आता आपण काय करायचं? मेट्रो, स्मार्टसिटी, लक्झरी महामार्ग बनवण्यासाठी भरपूर पैसे असणाऱ्या आपल्या सरकारकडे आपली क्रांती परंपरा चित्रपटाद्वारे दाखवण्यासाठी मात्र पैसे नाहीत. मंत्र्यांचे दौरे दहा टक्क्यांनी कमी केले. भोजनावळी दहा टक्क्यांनी कमी केल्या तरी चित्रपट निघू शकतो. दुष्काळही थोडा कमी होतो. पण महापुरुषांचा केवळ मतांसाठी वापर करणाऱ्यांना सांगायचं कुणी? निदान कानडीतला चित्रपट मराठीत डब करता येतो का हे तरी पाहावं. त्यासाठी शासकीय दर्जा आणि कॅबिनेटचा दर्जा असलेली एखादी कमिटी तर नेमावी. संकोच बाळगू नये. विनोद तावडेंना या समितीत घातलं तरी बिघडणार नाहीय.

**– पंक्चरवाला**

***

# अपेक्षा

आपण वर्षानुवर्षे
राहतो ज्या पर्यावरणात
नंतर तिथून बाहेर पडल्यावरही
वाटतं आपल्याला ते पर्यावरण तसंच पूर्वीसारखं
गुंतलेलं असतं त्यात आपलं भावविश्व

हे लक्षातच येत नाही
आपण भाबडे होतो
की उदार होतो
की जिवापाड प्रेम करीत होतो
की... काय कळेना

खूप वर्षे आपण आपल्या पर्यावरणात
राहूनही नाही आजमावता आलं
समोरच्या माणसांना



ज्यांना तुम्ही आपले मानत होता
अडचणीच्या वेळी त्यांनी हात दिला
स्थिरस्थावर झालो तेव्हा
त्यांना आपण त्यांच्या छावणीत अपेक्षित होतो

ते जमलं नाय आपल्याला
जमणार नव्हतंच
नाहीच जमणार

आता ते कसे सामोरे येतील
माहीत नाही
माझ्या बाजूने डावपेचाचा मुद्दाच
नाही

**– मनोहर जाधव**

***

---

वाचक म्हणतात...

## बाबासाहेबांचे महत्त्वाचे संदर्भ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १४ फेब्रुवारी १९२० रोजीच्या 'मूकनायक'मध्ये लिहितात, 'एका व्यक्तीने किंवा वर्गाने आपले चांगभले करण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीचा किंवा वर्गाचा घात करण्यास सुरुवात केली तर अं:तस्थ शांततेचा भंग होण्याचा संभव असतो. आणि शांततेशिवाय सामाजिक जीवन धोक्याचे होऊन मानवात नित्य होत असलेला कार्यक्रम बंद पडतो. अशामुळे शासन हा जरी महत्त्वाचा हेतू आहे तरी नुसते शासन करण्याचा म्हणजे प्रजेस अमुक करू नका व शांतता मोडल्यास दंड होईल असे बजावणाऱ्या राज्यपद्धतीस हल्लीच्या काळी तारतम्याने 'रानटी' म्हणावे लागले'.

बाबासाहेबांनी सद्यस्थितीला धरून म्हटले आहे की, 'जेथे राज्यकारभार एका विशिष्ट वर्गाचे हित होऊन बसतो, मग तो वर्ग स्वकीयांचा असो वा परकीयांचा. तेथे संस्कृतीपेक्षा शासनास प्राधान्य मिळते. शांतता भंगामुळे त्याच्या अंमलास धोका येण्याचा संभव असतो. शांतता जरी आवश्यक असली तरी शांततेच्या नावाखाली जुलूम होणे अगदी सहाजिक असते. शांतता ठेवण्यास कोणाच्या तरी स्वातंत्र्यास निर्बंध घालावा लागतो. व्यक्तीच्या स्वातंत्र्यास केव्हा निर्बंध घालावा व केव्हा घालू नये याचा निर्णय करताना स्वातंत्र्य आणि स्वच्छंद असा भेद केला पाहिजे. परंतु स्वातंत्र्य कायम ठेवून त्याचे स्वच्छंदात पर्यवसान न होऊ देणे हे इतके नाजूक काम आहे की, बऱ्याच प्रसंगी स्वातंत्र्याचा उच्छंखलपणा मोडण्यासाठी स्वातंत्र्यावरच गदा येते.

डॉ. बाबासाहेबांच्या वरील दोन संदर्भांचा अर्थ वाचकांच्या निश्चितच लक्षात आला असेल. जे देशभर घडत आहे. ज्यामध्ये बाबासाहेबांचा गर्भित इशाराही आहे. 'द पीपल्स पोस्ट'च्या भावी वाटचालीस माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा...!

**– योगीराज बागूल**




# विशिष्ट विचारधारेमुळे संविधान धोक्यात

## डॉ. सुखदेव थोरात यांचे प्रतिपादन : अमरावतीत 'पीपल्स पोस्ट'चे प्रकाशन

**अमरावती :** भारतीय संविधान भारताचे एक सौर्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही व गणराज्य या पंचतत्त्वावर आधारित आहे. या तत्त्वामुळेच स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय प्रस्थापित होणार आहे. सद्यस्थितीत आपले खुलेपणाने विचार मांडणे, मुक्तपणे अभिव्यक्त होणे याबाबत सर्वांच्या मनात भीती निर्माण करण्याचे काम, व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने आणण्याचे काम एक विशिष्ट विकृत विचारधारा करीत आहे. या मंडळींना सरकारी समर्थन असल्याचे भासत आहे. संविधानिक मूल्यांना तडा देण्याचे काम सरकार पुरस्कृत आहे, असे घणाघाती प्रतिपादन ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत व लेखक तथा विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी केले. ते 'द पीपल्स पोस्ट' या पाक्षिकाच्या अमरावतीत झालेल्या प्रकाशन सोहळ्यात बोलत होते.

अध्यक्षस्थानी 'दैनिक विदर्भ मतदार'चे संपादक ॲड. दिलीप एडतकर होते. प्रमुख अतिथी ख्वाजा बेग, ज्येष्ठ पत्रकार तथा शेतकरी आंदोलक चंद्रकांत वानखडे, संभाजी ब्रिगेडचे राष्ट्रीय प्रवक्ता प्रेमकुमार बोके, विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक तथा सिनेट सदस्य डॉ. भीमराव वाघमारे, 'द पीपल्स पोस्ट'चे संपादक चेतन शिंदे व कार्यक्रमाचे आयोजक सुधाकर तलवारे उपस्थित होते.

डॉ. थोरात म्हणाले, या सरकारमध्येच अनुसूचित जाती-जमातीवर अत्याचार होत होतेच, नाही असे नाही पूर्वीही होत होते. पण गुन्हेगारांना प्रशासनाचा, शासनाचा वचक राहायचा. आता या मंडळींना ना प्रशासनाचा व ना शासनाचा धाक राहिलेला आहे. ते बिनबोभाटपणे, खुलेआमपणे अन्यायकरीत आहेत. संविधानाने धार्मिक स्वातंत्र्य दिले, आपापल्या धर्माचा प्रचार व प्रसार करण्याचे व धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य आहेच. पण, अलीकडच्या काळात त्यांचेही सार्वजनिकपणे भांडवल करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसत आहेत. हे राष्ट्र धर्मनिरपेक्ष आहे. सर्वधर्मसमभाव जोपासण्याचे अभिवचन संविधान देत आहे; पण राष्ट्रविकासात धार्मिक धुडगूस घालून कोण्या एका धर्मालाच पुरस्कृत करण्याचे प्रकार वाढल्यामुळे भारतीय संविधानच धोक्यात येईल की काय, अशी भीती वाटत असल्याचे डॉ. थोरात यांनी सांगितले.

चंद्रकांतदादा वानखडे म्हणाले, पूर्वी पत्रकारांनी सरकारच्या विरोधात लिहिले तरीही धमक्या वगैरे येत नसत. आज कोणती बातमी यावी किंवा कोणती बातमी चालवावी याकरिता प्रधानमंत्री कार्यालयातून व मुख्यमंत्री कार्यालयातून फोन येतात. सरकारविरोधी बोलले किंवा लिहिले तर देशद्रोही म्हणून शिक्का मारला जातो. प्रा. प्रेमकुमार बोके म्हणाले की, ज्यांचा या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात दुरान्वयानेही संबंध नाही ते लोक तुम्हा आम्हाला देशभक्ती शिकवित आहेत. ज्यांच्या मातृसंस्थेच्या कार्यालयावर तिरंगा फडकत नाही ते देशभक्तीचे गोडवे गात आहेत. त्यांना छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, शाहू महाराज, जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी काहीही देणेघेणे नाही, त्यांना भारतीय संविधान नको आहे. देशात अनेक धर्म आहेत. ईद असो, बुद्ध जयंती असो, श्रीराम जयंती असो, येशू ख्रिस्ताची जयंती असो, डॉ. आंबेडकर जयंती असो, पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावला जातो. वास्तविक हे सर्व सण-उत्सव आपल्या आनंदाचे आहेत. तरीही तगडा पोलिस बंदोबस्त कशासाठी? ज्या दिवशी सण-उत्सवाला पोलिस बंदोबस्ताची गरज राहणार नाही त्या दिवशी या देशात खरी लोकशाही प्रस्थापित होईल, असे प्रतिपादन आमदार ख्वाजा बेग यांनी केले.

दिलीप एडतकर म्हणाले, वृत्तपत्रे सध्या मोठ्या पेचात आहेत. वृत्तपत्रात नवचेतना निर्माण करण्याचे, सर्वसामान्यांना न्याय देण्याचे मोठे माध्यम आहे. तेव्हा 'द पीपल्स पोस्ट' या पाक्षिकाद्वारे ते काम होईल असा आशावाद व्यक्त केला.

प्रास्ताविक 'द पीपल्स पोस्ट'चे संपादक चेतन शिंदे यांनी केले. आभार सुधाकर तलवारे यांनी मानले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. जगदीश गोवर्धन यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रणजित चव्हाण, संजय शेंडे, सेवानंद वाकोडे, भाऊराव वावरे, प्रा. अनिल गोटे यांनी परिश्रम घेतले.

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

२०%

## सवलत!

**देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक**

---

**हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!**

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदाराचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा :

कार्यालय : ११ तळमजला, बी ब्लॉक, लक्ष्मी निवास,
जे.के. सावंत मार्ग, यशवंत नाट्य मंदीरा समोर,
माहीम (वेस्ट), मुंबई- ४०००१६

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ६०० | ५०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३०० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १५० | १५० | |

(वार्षिक विशेषांक - ६) / (६ महिने-३)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. ---------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. ---------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ------------------------------------ जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ---------------------------------------------------------------- पत्ता : ------------------------------

------------------------------------------------------------ शहर : ------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : -------------------- फोन नं. (घर) : --------------------------

मो. नं. : ---------------------- इ-मेल : -------------------------------------------------------


आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता
२९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२
किंवा ७३५००९१५६९ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा
thepeoplespost2014@gmail.com

WWW लॉग ऑन करा
www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.



गाव...
Kabhi Kabhi
गाव का स्वाद...
Chaho Jabhi
Chulha Village
RURAL INDIAN | INDIAN | MUGHLAI | CHINESE | THAI
A Village Themed Restaurant
Now Open near Hiranandani Estate
AC DINING
OPEN DINING
COOL WITH THE MIST
LIVE CHULHA
EXOTIC RURAL TOUCH
TREE TWIG ISLANDS
WOOD SHACKS
Chulha Village, Next to Vijay Annex, Bldg. 31/32
Waghbil-Hiranandani Estate Junction,
Waghbil, Thane (W)
FOR RESERVATIONS
CALL 91362 15403 / 15404 / 15405 / 15406


Haldiram's
NAGPUR
TASTE OF TRADITION
Sweets & Namkeen
zubaan ka
zaika badal de
Haldiram's
TASTE OF TRADITION
INDIAN SWEETS / BONBONS INDIENS
PRODUCT OF INDIA / PRODUIT DE L'INDE
Soan Papdi
NET WEIGHT : 1 kg (500 g x 2 unit)
Haldiram's
INDIAN SNACKS
CASSE-CROÛTE INDIENS
Haldiram's
INDIAN SNACKS
CASSE-CROÛTE INDIENS
Haldiram's
INDIAN SNACKS
CASSE-CROÛTE INDIENS
ALOO BHUJIA
Rasgulla
Rasgulla
Gulab Jamun
Gulab Jamun
visit our website at www.haldirams.com